# चैतन्य लहरी

मार्च/ एप्रिल २००८ अंक क्र. ३/४



शिव पूजा, ९ मार्च २००८

शिव पूजा, ९ मार्च २००८





ख्रिसमस पूजा २००७, निर्मल नगरी - पुणे



## अनुक्रमणिका


- श्रीगणेश जयंती पूजा,(वृत्तांत) १० फेब्रुवारी २००८,प्रतिष्ठान पुणे ........ २
- श्रीगणेश जयंती पूजा, प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण, १०, फेब्रुवारी २००८, प्रतिष्ठान पुणे ........ ३
- ईस्टर पूजा,नागपूर ,२३ मार्च २००८ ........ ४
- पुणे महानगरपालिका सत्कार समारंभ,७ एप्रिल, २००८ ........ ५
- सौ साधनादीदी वाढदिवस समारंभ,प्रतिष्ठान - १ मार्च २००८ ........ ६
- शिवरात्री पूजा, प्रतिष्ठान , ६ मार्च २००८ ........ ६
- शिवपूजा, ८,९ मार्च, २००८ निर्मलनगरी, पुणे ........ ६
- वाढदिवस पूजा समारंभ,(वृत्तांत) छिंदवाडा, लिंगा, निर्मल नगरी ,१८ मार्च ते २३ मार्च २००८ ........ ७
- श्रीमाताजींसोबत सहजयोग्यांना लाभलेला स्वर्गीय विमानप्रवास. ........ ९
- ईस्टर पूजा संदेश - (सारांश) मैगलानो, इटली. ११ एप्रिल, १९९३ ........ १०
- डोळे ........ ११
- आत्मप्रकाश, निर्मल योग ५.६.१९९३ ........ १२
- श्रीमाताजींनी काही भारतीय मसाल्यांविषयी दिलेली माहिती ........ १३
- श्रीमाताजींना विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे ........ १४
- गुढी पाडवा -दिल्ली, २४.०३.९३ . ........ २०


सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, सहजयोगातील कॅसेट,सी.डी., पुस्तके, मासिके,श्रीमाताजींचे फोटो, कॅलेंडर, चैतन्यलहरी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था, "**निर्मल ट्रान्स्फॉर्मेशन प्रा.लि.पुणे**" या कंपनीमार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, **निर्मल ट्रान्स्फॉर्मेशन प्रा.लि.पुणे**. या कंपनीच्या लेखी परवानगी शिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करू नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लिडरवर राहील. तसेच चैतन्य लहरी मासिकाचे सन २००८ सालासाठी नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL TRANSFORMATION PVT. LTD." या नावाने पाठविताना पाकिटावर चैतन्य लहरी (मराठी) लिहिणे आवश्यक आहे. सभासदांची वार्षिक वर्गणी मागील वर्षाप्रमाणेच अंक हातपोच घेणाऱ्यांसाठी रुपये २००/- व पोष्टाने मागविणाऱ्यांसाठी रुपये २२५/- एवढी ठेवली आहे. तसेच परगांवच्या सहजयोग्यांनी शक्य झाल्यास ग्रुप बुकिंग केल्यास अंक पोष्टाने पाठविताना सोईचे होईल. कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.


NIRMAL TRANSFORMATION PVT. LTD.

BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. PAUD ROAD, KOTHRUD, PUNE 411 038.

TEL. 020 25286537

# श्रीगणेश जयंती पूजा,(वृत्तांत)

## दिनांक १० फेब्रुवारी २००८,प्रतिष्ठान पुणे

आज प्रतिष्ठानमध्ये श्रीमाताजींची गणेशजयंती निमित्ताने पूजा आयोजित केली होती. श्रीमाताजी व श्री पापाजींचे रात्री ८.०० च्या सुमारास हॉलमध्ये आगमन झाले. श्रीमाताजी पिवळ्या साडीत फारच सुंदर दिसत होत्या. श्रीमाताजी बसताना बोलत होत्या. खूप आनंदी,प्रसन्न दिसत होत्या. सुरवातीला श्रीमाताजींना दोन सुवासिनींनी ओवाळले. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणावर हार अर्पण करण्यात आला. त्यानंतर श्रीमाताजींच्या समोर माईक ठेवण्यात आला. श्रीमाताजी जवळपास ३०-३५ मिनीटे बोलल्या. त्यामध्ये त्यांनी श्रीगणेशांबद्दल बरीच माहिती सांगितली.

त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणाची पूजा सुरू झाली. श्रीमाताजींच्या चरणाजवळ श्री राजेंद्र पुगालिया व श्री नलगिरकर दोन्ही बाजूला बसले होते. पूजेच्या वेळी प्रथम सर्व लहान मुलांनी श्रीमाताजींच्या चरणांवर फुले वाहिली. त्यानंतर महाराष्ट्राचे लिडर्स, तसेच दिल्लीचे निमंत्रीत, तसेच प्रमुख निमंत्रीत यांनी श्रीमाताजींच्या चरणांवर फुले वाहून पूजा केली. आजच्या पुजेचे वैशिष्ट्य म्हणजे श्रीमाताजींच्या चरणांवर आज श्रीपापाजींनी फुले वाहून पूजा केली. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणावर हार अर्पण करण्यात आला. श्रीमाताजींची ओटी भरण्यात आली. त्यांना फुटाणे, फळे, तसेच महाप्रसाद अर्पण केला. त्यानंतर श्रीमाताजींना प्रतिष्ठानमधील युवाशक्तीने प्रेझेंट अर्पण केले.

आजच्या पूजेसाठी आलेले नाशिकचे श्री धुमाळ आणि सहकारी यांच्याकडे पाहून श्रीमाताजींनी त्यांची माहिती घेतली. त्यावेळी श्रीमाताजींनी त्यांच्या सर्व कुटुंबाला पुढे बोलावले. त्यावेळी श्री धनंजय धुमाळ यांनी त्यांच्या सर्व कुटुंबाची ओळख करून दिली. त्यांचे आलेले सर्व कुटुंबच गायक , वादक, असल्याने श्रीमाताजी फार हसत होत्या. श्री धुमाळ यांच्या सोबत आलेल्या त्यांच्या कुटुंबातील १३ सदस्यांची तसेच श्री धुमाळ यांच्या आईची श्रीमाताजींनी जातीने चौकशी केली. सर्वांना आशीर्वादीत केले. तसेच श्री धनंजय धुमाळ यांच्याशी बोलताना त्यांना कै बाबामामांची सारखी आठवण येत होती.

त्यानंतर श्रीमाताजींची आरती करण्यात आली. आरतीच्या वेळी श्रीपापाजींनी उदबत्त्या घेऊन सर्वांबरोबर आरती केली. त्यानंतर सर्वांनी श्रीमाताजींचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर परत श्री धुमाळ आणि सहकारी यांनी अनेक भजने सादर केली.त्यावेळी प्रत्येक भजनानंतर श्रीमाताजी सारख्या श्री धनंजय धुमाळ यांच्याशी बोलत होत्या. त्यावेळी परत परत कोणते वाद्य कोण वाजवतो त्याची नावे विचारली. श्रीमाताजी श्री धुमाळ आणि सहकाऱ्यांवर फारच खुष होत्या. गाणी चालू असताना बाजूला दोन लहान मुली जागेवर बसून नाच करीत होत्या. त्यांच्याकडे पाहून श्रीमाताजी सारख्या हसत होत्या.

श्री धुमाळ यांनी पूजेच्यावेळी आणि नंतर, हेमजा सुतम भजे, जय गणपती जी, तुने मुझे बुलाया, निराकार साकार, नाशिकचा जोगवा, निर्मला किती वर्णावी तुझी ग स्तुती, दमा दम मस्त कलंदर ही भजने सादर केली. प्रसिद्ध सिनेसंगीतकार सहजयोगी श्री धनंजय धुमाळ यांच्यासोबत त्यांच्या कुटुबातील भगिनी कु रेखा, कु राजेश्री,कु बागेश्री, कु आशा, तसेच लतादिदि आंबेकर, त्यांचे पती संजय आंबेकर, तसेच चि.स्वरांजय धुमाळ, विजय धुमाळ,अनिल धुमाळ,कु.परिणीता धुमाळ, कु. संगिता धुमाळ, त्यांच्या मातोश्री सौ शकुंतला धुमाळ. त्यांच्या पत्नी मंजुशा धुमाळ, कु शशीकांत मंडलिक उपस्थित होते.

आरतीनंतर नागपूरचे लिडर यांनी श्रीमाताजींच्या भजनाच्या सीडीचे उद्‌घाटन केले. त्यानंतर श्रीमाताजींनी डॉ कळसकर यांच्या मुलांशी बोलून त्यांची चौकशी केली. आज श्रीमाताजी फारच खुष होत्या.

●●●

# श्री गणेशजयंती पूजा

प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण
१०, फेब्रुवारी २००८, प्रतिष्ठान पुणे



*श्री गणेश शक्तीचे विशेष आशीर्वाद असलेल्या व्यक्ती काही विशेष असतात. त्यांना दुनियेतल्या सर्व चुकीच्या गोष्टींची नफरत (घृणा) असते; आणि अशा व्यक्ती कोणत्याही चुकीच्या गोष्टी करत नाहीत याचे कारण, श्रीगणेश त्यांना चुकीच्या गोष्टींपासून दूर ठेवतात.*

आजचा दिवस आपल्या सर्व सहजयोग्यांसाठी अतिशय महत्त्वपूर्ण आहे. याचे कारण या शुभदिनी श्री गणेशांचा जन्म झाला आणि श्रीगणेश हे आपले आराध्य दैवत होय. त्यांच्यामुळेच आपल्याला जागृती मिळाली. त्यांची कितीही आठवण काढा, पण जोपर्यंत त्यांची महानता आपण जाणत नाही तोपर्यंत त्यांना आपण प्राप्त करू शकत नाही. ते संपूर्ण ब्रह्मांडाचे स्वामी होय! ब्रह्म म्हणून जे आहे त्याचाच अवतार श्रीगणेश होय! या विश्वामध्ये संगीत,ताल,सूर याची निर्मिती त्यांनीच केली. त्यांच्याच कृपेमुळे यामध्ये लोक तल्लीन होऊन जातात. या छोट्याशा बालकाने या विश्वात येऊन इतके कार्य केले. आज ही चालू आहे. श्रीगणेशांची आराधना कितीही करा, ती कमीच असते. बरेच लोक म्हणतात की आम्हाला काही पूजा करून ही श्रीगणेशांचे दर्शन काही होत नाही. खरं तर ते सर्वज्ञ आहेत. सर्व ठिकाणी आहेत, सर्वत्र व्यापून आहेत. जोपर्यंत आपण पार होत नाही, तोपर्यंत त्यांना आपण ओळखू शकत नाही. एकदा पार झाल्यावर तुम्ही त्यांना ओळखू शकता. गणेश म्हणजे शुद्धता, पावित्र्य. शुद्ध आत्मा होय! ते जेव्हा आपल्यामध्ये जागृत होतात तेव्हा आपल्याला कोणताही प्रश्न उरत नाही.

प्रत्येक कार्यामध्ये यश मिळते; व आपल्याला प्रत्येक गोष्टीतून आनंद मिळतो. ते स्वतः आनंद स्वरूप आहेत आणि सर्वांना आनंद देतात. त्यांची सेवा करणे हा आपला परम धर्म आहे.त्यांची सेवा म्हणजेच, छोट्या बालकांची काळजी घेणे, त्यांचा सांभाळ करणे, त्यांच्याशी छलकपट न ठेवणे अशा प्रकारे ते आपल्यावर प्रसन्न होतात.

अशा प्रेमस्वरूपी श्रीगणेशांचा या शुभदिनी जन्म झाला. आजच्या दिवशी आपण त्यांच्यापाशी काही इच्छा कराल ते ती पूर्ण करतील.आपण सर्व पार आहात. हृदयापासून त्यांना प्रार्थना करा, ते क्षणोक्षणी आपली मदत करतील. पूर्वीच्या काळी लोकांना हे सर्व अनाकलनीय होते पण आता तुम्ही हे जाणू शकता की श्रीगणेशांच्यामुळे आपल्याला जागृती मिळते. त्यांच्या स्मरणाने कोणतेही रोग असो, कितीही त्रास असो ते दूर होतात. ते चिरंजीव आहेत. आपल्यामध्ये सतत त्यांचा वास असतो. जेव्हा तुम्ही पार असता तेव्हा हे सर्व समजू शकता, जाणू शकता.

श्री गणेशांची कृपा असल्यावर तुम्ही अनेक कामे करू शकता. आपल्याला कधी आळस येणार नाही. तसेच काही त्रासही होणार नाही. कारण तुमचे सर्व कार्य तेच करत असतात.तेच तुम्हाला सांभाळतात. ते एक छोटेसे बालक आहेत; पण तेच तुम्हाला सांभाळतात.

ती एक प्रचंड शक्ती आहे. श्रीगणेशांच्या शक्तीमुळे अनेक कार्य साध्य होतात. आमच्या दृष्टीने ते अतिशय पवित्र असून ते आमच्या फार जवळचे आहेत. आम्ही तर त्यांना खूप सतावतो. जर कधी कुणी व्यक्ती आडवळणावर जात असेल तर आम्ही श्रीगणेशांना सांगतो, की तुम्हीच त्याला सांभाळा, तुम्हीच त्याला ठीक करा! हे खूप कठीण काम आहे. माझ्या दृष्टीने मुश्कील आहे, तेव्हा ते त्याकडे पाहतात. ते सरळ करतात.

दुसरी गोष्ट म्हणजे आज पंचमी आहे ही पंचमी अशासाठी मानली जाते, की या दिवशी आपल्याला वस्त्रावरण धारण करण्याची जी शालीनता असते ती त्यामुळेच प्राप्त होते. लज्जा रुपेण संस्थिता! आपल्यामध्ये ही जी लज्जा असते ती त्यांच्याच कृपेमुळे असते आणि त्यामुळे आपल्याला खरंच खूप लाभ होतात.

जोपर्यंत तुम्ही श्रीगणेशांची आराधना करीत नाही, तोपर्यंत तुम्ही कुठलाच आनंद घेऊ शकत नाही. श्रीगणेशांच्या आराधनेमुळेच आपण आनंद घेऊ शकतो. म्हणूनच ते स्वयं आनंदस्वरूपच आहेत.

प्रत्येक कार्यातच आपण त्यांची सहायता (मदत)घेतो. पण आपण हे लक्षात घेत नाही, की त्यांना प्रसन्न करण्यासाठी आपण काय करतो? या गोष्टीकडे आपले लक्ष जात नाही. त्यासाठी आपणही काही केले पाहिजे, आपली अशी स्थिती बनली पाहिजे की आपल्या आत श्रीगणेश जागृत होतील, ज्यामुळे आपण कधीही चुकीच्या मार्गावर जाणार नाही. श्रीगणेशशक्तीचे विशेष आशीर्वाद असलेल्या व्यक्ती काही विशेष असतात. त्यांना दुनियेतल्या सर्व चुकीच्या गोष्टींची नफरत (घृणा) असते; आणि अशा व्यक्ती कोणत्याही चुकीच्या गोष्टी करत नाहीत याचे कारण, श्रीगणेश त्यांना चुकीच्या गोष्टींपासून दूर ठेवतात. त्यांना कोणत्याही चुकीच्या कार्यात आनंद वाटत नाही. ही श्रीगणेशांचीच कृपा होय! असे आनंदमयी जीवन आपल्याला प्राप्त झाले आहे. त्यामुळे आपण सर्वजण आज त्यांची स्तुती केली पाहिजे की ज्यामुळे ते प्रसन्न होतील.

–आपल्या सर्वांना अनंत आशीर्वाद!

• • •

## ईस्टर पूजा

### नागपूर – दिनांक २३ मार्च २००८

श्रीमाताजींचे संध्याकाळी ५.००च्या सुमारास नागपूरमधील 'दी प्राईड हॉटेल' मध्ये आगमन झाले. श्रीमाताजी अत्यंत आनंदी व प्रसन्न दिसत होत्या. त्यांच्या स्वागतासाठी बाहेरच्या बाजूला बरेच सहजयोगी जमले होते. श्रीमाताजींच्या सोबत श्रीपापाजी व आनंदभैय्या होते.श्रीमाताजींची त्यांच्या शयनकक्षात प्रथम आरती झाली. त्यानंतर त्यांच्या चरणावर हार अर्पण केला.श्रीमाताजी खूपच आनंदी होत्या. त्यांच्या थोड्याशा विश्रांतीनंतर पूजेसाठी तळमजल्यावर असलेल्या हॉलकडे त्या निघाल्या. तळमजल्यावर पूजेची पूर्ण तयारी केली होती.

श्रीमाताजींचे हॉलमध्ये आगमन होताना आगत–स्वागत हे गीत झाले. प्रथम श्रीमाताजींची आरती झाली. त्यानंतर श्रीमाताजींनी साधारण वीस मिनीटे इंग्रजी भाषेत अमृतवाणी केली. त्यामध्ये त्या प्रामुख्याने क्षमा करण्याविषयी बोलल्या. सहजयोग्यांनी तात्पुरती क्षमा न करता परमनंट क्षमा केली पाहिजे असे सांगत असताना त्या येशुख्रिस्ताबाबत बोलल्या. (श्रीमाताजींचे भाषण स्वतंत्र प्रसिद्ध करण्यात येईल)श्रीमाताजींच्या चरणावर हार अर्पण करण्यात आला.आज श्रीमाताजी खूपच आनंदी व प्रसन्न होत्या. त्यानंतर त्यांच्या चरणांची पूजा लहान मुलांनी फुले वाहून केली. श्रीमाताजींची ओटी भरण्यासाठी महिला स्टेजवर आल्या. त्यावेळी श्रीमाताजींच्या चरणांची पूजा व त्यांच्या पूजेतील दागदागिने त्यांना अर्पण केले. त्यानंतर त्यांनी मुकुट परिधान केला. श्रीमाताजींना महाप्रसादाचा नैवेद्य तसेच प्रसाद दाखविण्यात आला. श्रीमाताजींनी मुकुट परिधान केलेला असताना त्यांची आरती झाली.

आरतीनंतर श्रीमाताजींच्या चरणांवर श्री आनंदभैय्या आणि सहकाऱ्याने हार अर्पण केला. त्यानंतर श्रीमाताजींना काही परदेशी पाहुण्यांनी तसेच स्थानिक नागपूरच्या सहजयोग्यांनी प्रेझेंट अर्पण केले. त्यानंतर श्रीपापाजीं स्टेजवर श्रीमाताजींच्या शेजारी बसले. त्यावेळी अंड्याच्या आकाराचा सुंदर असा पांढरा केक श्रीमाताजींच्या समोर मांडण्यात आला. श्रीमाताजींनी टाळ्यांच्या आवाजात केक कापला. श्रीमाताजींना श्रीपापाजींनी केक भरवला. त्यानंतर श्रीमाताजींसमोर जागो सवेरा आया है हे भजन झाले. पूजेतील सर्व भजने नागपूर युवाशक्तीने सादर केली. साधारण ८.३० च्या सुमारास कार्यक्रम संपला. त्यानंतर श्रीमाताजी आपल्या शयनकक्षाकडे परतल्या.

• • •

# पुणे महानगरपालिका सत्कार समारंभ
## ७ एप्रिल, २००८

पुणे महानगरपालिकेतर्फे श्रीमाताजींना व श्रीपापाजींना मानपत्र देण्याच्या कार्यक्रमाचे त्यांच्या लग्नाच्या ६१ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात आयोजन केले होते. साधारण १५ दिवसांपासूनच या कार्यक्रमाची तयारी सुरू झाली होती. संपूर्ण पुणे शहरात सर्वत्र कमानी, बॅनर्स, पोस्टर्स लागले होते. तसेच वर्तमानपत्रात रोजमोठमोठ्या जाहिराती प्रसिद्ध होत होत्या. त्यामुळे संपूर्ण पुणेकर या दिवसाची आतुरतेने वाट पहात होते.

बालगंधर्व रंगमंदीराचा परिसर सजविण्यात आला होता. मंदिरातील बसण्याच्या आसनांची संख्या मर्यादित असल्याने बाहेरच्या बाजूला स्क्रिन लावले होते. पुढच्याबाजूला अतिशय सुंदर रांगोळी काढली होती. एका बाजूला सनईवादन चालले होते तर दुसऱ्या बाजूला बॅन्डचे वादन चालू होते. साधारण ४.३० च्या सुमारास महापौर सौ राजलक्ष्मी भोसले, उपमहापौर, सर्व सदस्यांचे बालगंधर्वमध्ये आगमन झाले. त्यानंतर ५.०० च्या सुमारास प्रमुख पाहुणे श्री बाबासाहेब पुरंदरे यांचे आगमन झाले. त्यांचे स्वागत महापौरांनी केले. त्यानंतर थोड्याच वेळात श्रीमाताजी, श्रीपापाजी व सौ साधनादीदींचे आगमन झाले. त्यावेळी पुढच्याबाजूला बॅन्डपथक धून वाजवित होते. श्रीमाताजींना व श्रीपापाजींना महापौर व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी स्वागत करून त्यांना स्टेजवर नेण्यात आले. स्टेजवर श्रीमाताजींच्या एका बाजूला श्रीपापाजी व दुसऱ्या बाजूला महापौर आणि सर्व सहकारी बसले होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीला श्रीमाताजींच्या कार्यासंदर्भातील फिल्म सर्वांना दाखविण्यात आली. त्यानंतर विदेशी सहजयोग्यांनी 'महाराष्ट्र देशा' हे भजन सादर केले. त्यानंतर महापौरांनी स्वागतपर भाषणात श्रीमाताजींच्या कार्याबद्दल तसेच श्रीपापाजींच्या कार्याबद्दल माहिती दिली त्यावेळी त्यांनी त्यांच्या काळात हा कार्यक्रम होत असल्याबद्दल परमेश्वराचे आभार मानले.यानंतर महापौरांनी प्रमुख पाहुणे श्री बाबासाहेब पुरंदरेंचा सत्कार केला. त्यानंतर महापौरांनी श्रीमाताजींना व श्रीपापाजींना पुणे महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या मानपत्रातील मसुद्याचे वाचन केले.

त्यानंतर महापौरांनी श्रीमाताजींच्या चरणाची पूजा करून



त्यांना कुंकू लावले. शाल पांघरली, त्यांना हार अर्पण केला.श्रीमाताजींना ट्रॉफी, व मानपत्र प्रचंड टाळ्यांच्या आवाजात देण्यात आले. श्रीपापाजींचा सत्कार महापौर करताना श्रीपापाजींच्या डोक्यावर पुणेरी पगडी, उपरणे घालण्यात आले,हार घातला,ट्रॉफी व मानपत्र देण्यात आले.

सहजयोग परिवारातर्फे सौ साधनादिदींनी महापौर श्रीमती राजलक्ष्मी भोसले यांचा सत्कार केला, श्री राजेंद्र पुगालिया यांनी श्री बाबासाहेब पुरंदरेंचा सत्कार केला. तसेच उपमहापौर व सहकाऱ्यांचा आपल्या कार्यकर्त्यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

त्यानंतर प्रमुख पाहुणे श्रीबाबासाहेब पुरंदरे यांनी भाषण केले,त्यावेळी त्यांनी श्रीमाताजी सर्व विदेशी अनुयायांना घेऊन तिकीट काढून 'जाणता राजा' कार्यक्रमाला आल्याचे तसेच त्यांच्या सहवासात त्यांनी अनुभवलेल्या त्यांच्या अवताराबाबत थोडक्यात सांगितले. त्यानंतर त्यांनी श्रीमाताजींच्या चरणाचे दर्शन घेतले. श्रीमाताजींच्या कुटुंबाच्या वतीने सौ साधनादीदींनी सर्वांचे आभार मानले. शेवटी विरोधी पक्षनेते श्री विकास मटकरी यांनी आभार प्रदर्शनाच्या कार्यक्रमात श्रीमाताजींच्या कार्याचे कौतुक करून सर्वांचे आभार मानले.

त्यानंतर श्रीमाताजी व श्रीपापाजी परत आपल्या निवासस्थानी गेल्या.

● ● ●

## सौ साधनादीदी वाढदिवस समारंभ,प्रतिष्ठान - १ मार्च २००८

साधारण १०.०० च्या सुमारास श्रीमाताजी ,श्रीपापाजी व सौ साधनादीदींचे आगमन झाले. त्यावेळी हॅपी बर्थ डे हे गीत वाजवले. लहान मुलांनी चक्के पे चक्के या गाण्यावर नृत्य केले. त्यानंतर पुणे म्युझिक ग्रुपने माता का करम है ही कव्वाली सादर केली. त्यावेळी सौ साधनादीदींचे जावई व मुलीचे आगमन झाले. त्यानंतर परत लहान मुलांनी हम भी अगर बच्चे होते या गाण्यावर नृत्य केले. यावेळी सर्वजण फारच हसत होते.नंतर हॅपी बर्थडे या गाण्यावर नृत्य केले. शेवटी बमबम बोले मस्ती मे डोले या गाण्यावर नृत्य केले. सौ साधनादीदीनी केक कापत असताना बार बार ये दिन आये, तुम जिओ हजारो साल ही भजने सादर केली. साधनादीदींनी श्रीमाताजी व श्रीपापाजींना केक भरवला. सर्व लहान मुलांना व म्युझिक ग्रुपला दीदींच्या हस्ते पाकिटे वाटण्यात आली. त्यानंतर श्रीमाताजींना फुलांचे बुके अर्पण करण्यात आले. त्यावेळी दिदींनी होळीवरचे गाणे म्हणण्यास सांगितले असता ' रंग ऐसा भरो 'हे भजन सादर केले. त्यानंतर श्रीमाताजी व श्रीपापाजीचे निवासस्थानी प्रस्थान झाले.

## शिवरात्री पूजा, प्रतिष्ठान , ६ मार्च २००८

सुमारे ७.४५ च्या सुमारास श्रीमाताजींचे व श्रीपापाजींचे आगमन झाले. त्यावेळेस सर्वजण आगत-स्वागत हे भजन म्हणत होते. श्रीमाताजींना ओवाळून त्यांच्या चरणांवर हार अर्पण केला. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणांची पूजा करण्यात आली. सुरवातीला लहान मुलांनी त्यानंतर परदेशी सहजयोग्यांनी श्रीमाताजींच्या चरणांवर फुले अर्पण करून पूजा केली. त्यावेळी जय महेश, जय शिव शंकर, श्रद्धा भक्ती, शंकर भोले भाले, ही भजने झाली.त्यानंतर श्रीमाताजींसमोर शंकराची आरती झाली. विविध देशांतून आलेल्या सहजयोग्यांनी श्रीमाताजींना गिफ्ट सादर केली. त्यावेळी प्रत्येक गिफ्ट श्रीमाताजी कौतुकाने पहात होत्या. नंतर श्रीमाताजी आपल्या निवासस्थानी परतल्या.

## शिवपूजा, ८,९ मार्च, २००८ निर्मलनगरी, पुणे

८ मार्च, २००८ - आजच्या दिवसाची सुरूवात सकाळी सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर संध्याकाळी ६.३० वाजता स्टेजवरील कार्यक्रम सुरू झाले . त्यामध्ये अनेक भजने व नृत्याचे कार्यक्रम झाले त्यात आंध्र प्रदेशच्या कलाकारांनी दमादम मस्त कलंदर ही कव्वाली सादर केली. सुब्रमण्यम् यांनी राग माला मध्ये श्री माताजींची १०८ नावे गायली. डॉ राजेश यांनी अनेक भजने सादर केली. त्यानंतर श्री अरुण आपटे यांनी सुंदर भजने सादर केली. रात्री ११.०० च्या सुमारास पुणे म्युझिक ग्रुपने अनेक कार्यक्रम सादर करताना सुरवातीला लहान मुलांनी नृत्य केले. श्री राजीव बागडदे यांनी दिलमे दिदार की आरजू है ही कव्वाली सादर केली.

९ मार्च, २००८-आजच्या पूजेच्या दिवसाची सुरवात सकाळी सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर संध्याकाळी ७.३० च्या सुमारास मुख्य कार्यक्रमाची सुरवात तीन महामंत्रांनी झाली. त्यावेळी सहज गायकांनी अनेक भजने सादर केली. त्यानंतर भूगाव प्रोजेक्ट बाबतची फिल्म दाखविण्यात आली. साधारण ९.०० च्या सुमारास श्रीमाताजींचे आगमन झाले. त्यावेळी श्रीमाताजींची प्रथम आरती झाली. त्यानंतर त्यांच्या चरणांवर हार अर्पण करण्यात आला. त्यानंतर लहान मुलांच्या हस्ते श्रीमाताजींची चरण पूजा झाली. त्यावेळी गणपती अथर्वशीर्ष व पूजेतील भजने झाली. त्यानंतर सौ कल्पनादीदींनी श्रीमाताजींना पूजेची आभुषणे घातली. त्यावेळी श्रीमाताजींची देवी स्वरूपातील पूजा संपन्न झाली.त्यानंतर त्यांना महाप्रसाद दाखविण्यात आला. त्यावेळी श्रीमाताजींनी स्टेजवर ठेवलेले चरण सौ कल्पनादीदींना त्यांच्याकडे आणण्यास सांगितले. कल्पनादीदींनी चरण आणल्यानंतर श्रीमाताजींनी ती व्हायब्रेट केली. देवी पूजा झाल्यानंतर श्रीमाताजींची शिवपूजा करण्यात आली. त्यासाठी श्रीमाताजींना पांढरे वस्त्र पांघरण्यात आले. त्यांच्या चरणांवर बेल,बेलफळ, धोत्राची फुले वाहून शिवपूजा करण्यात आली. त्यानंतर श्रीमाताजींची आरती झाली. आरतीनंतर श्रीपापाजींनी भाषण केले. त्यानंतर माता का करम ही कव्वाली श्री बागडदे यांनी सादर केली. सदर कव्वाली म्हणत असताना श्रीमाताजींनी उभे राहून टाळ्या वाजवायला सांगितले. त्यानंतर श्रीमाताजी आपल्या निवासस्थानी परतल्या.

## वाढदिवस पूजा समारंभ,(वृत्तांत)
### छिंदवाडा, लिंगा, निर्मल नगरी ,१८ मार्च ते २३ मार्च २००८



छिंदवाडा आगमन - १८.३.२००८

श्रीमाताजींचे नागपूरहून सेमिनारच्या ठिकाणी असलेल्या श्रीमाताजींच्या कायमस्वरूपी तयार केलेल्या **निर्मल स्थान** या निवासस्थानी साधारण ७.०० च्या सुमारास आगमन झाले. त्यावेळी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. पावसाने छोटासा सडा घातला. श्रीमाताजींसोबत श्रीपापाजी सौ कल्पनादीदी, सौ साधनादीदी व श्री आनंदभैय्या होते. श्रीमाताजींनी 'निर्मल स्थान' मधील सर्व खोल्यांची पहाणी केली. त्यानंतर श्रीमाताजींची आरती केली. त्यांच्या चरणांवर हार अर्पण केला. श्रीमाताजींनी त्यानंतर छिंदवाड्यातील जन्मस्थान पहाण्यासाठी निघण्याचे सांगितले. श्रीमाताजी साधारण ८.०० च्या सुमारास छिंदवाड्यातील त्यांचे जन्मस्थान पहाण्यासाठी निघाल्या. साधारण ८.३० च्या सुमारास त्या छिंदवाड्याला पोहचल्या. श्रीमाताजींनी फित कापून खोल्यांमध्ये प्रवेश केला. त्यानंतर जन्मस्थानाच्या वेगवेगळ्या खोल्या त्यांनी फिरून पाहिल्या. त्यानंतर त्या त्यांचा जन्म झालेल्या खोलीत आल्या. त्याठिकाणी श्रीमाताजींना ओवाळण्यात आले. त्यांच्या चरणावर घराच्या आर्किटेकने हार अर्पण केला. त्यावेळी कायमस्वरूपी ठेवण्यासाठी श्रीमाताजींनी चरण व्हायब्रेट करून दिले. श्रीमाताजींचा आठ महिन्याचा फोटो तिथे लावलेला होता.

त्यानंतर श्रीमाताजींनी दुसऱ्या खोल्यांची पहाणी करत असताना, जन्मस्थानाच्या डाव्याबाजूच्या रस्त्याकडचा दरवाजा उघडून बाहेरच्या बाजूला त्यांनी पाहिले. त्यावेळी त्या म्हणाल्या की, 'इधर तो हम खेलते थे'.त्यानंतर त्या जन्मस्थानाच्या मागच्या बाजूला आल्या. श्रीमाताजींनी मागच्या बाजूने पहाणी केली. त्यावेळी पूर्वी त्यांच्याकडे असलेल्या पोपट, माकड यांची आठवण म्हणून त्यांच्या समोर पिंजऱ्यातला पोपट व छोटेसे माकडाचे पिल्लू आणले असता श्रीमाताजी खूप आनंदी झाल्या. जगभरातून येणाऱ्या सहजयोग्यांना जन्मस्थानाकडे तोंड करून बसण्यासाठी मागच्या बाजूस नव्याने बांधण्यात आलेल्या हॉलमध्ये श्रीमाताजींचे आगमन झाले.त्यावेळी श्रीसुब्रमण्यम,'छिंदवाडामे जनम हुवा हमारी निर्मल माँ का' हे भजन म्हणत होते. श्रीमाताजींनी हॉलची पहाणी केल्यानंतर श्रीमाताजी, श्रीपापाजी, त्यांच्या बाजूला सौ कल्पनादीदी, सौ साधनादीदी व श्री आनंदभैय्या बसले. प्रथम श्रीमाताजींच्या समोर माईक ठेवण्यात आला. त्यांनी श्रीपापाजींना बोलण्याबाबत सांगितले. त्यानंतर श्रीपापाजींनी छोटेसे भाषण केले.त्यानंतर सौ कल्पनादीदींनी व सौ साधनादीदींनी भाषणे केली. त्यानंतर श्रीमाताजींच्या समोर केक मांडण्यात आला. श्रीमाताजींनी केक कापला.त्यावेळी श्रीपापाजींनी श्रीमाताजींना केक भरवला. सौ कल्पनादीदींनी श्रीपापाजींना केक भरवला. त्यानंतर श्रीपापाजींनी कल्पनादीदी, साधनादीदी व आनंदभय्याला केक भरवला.त्यानंतर श्रीमाताजी परत त्यांच्या जन्मस्थानाच्या जागेत आल्या. त्यावेळी त्यांनीं त्यांची आरामकक्षाची खोली पाहिली. नंतर श्रीमाताजी परत सेमिनारच्या ठिकाणच्या निर्मल स्थान या आपल्या निवासस्थानी परतल्या.

श्रीमाताजींची विश्रांती - १९.३.२००८

आज श्रीमाताजींनी दिवसभर विश्रांती घेतली. त्यावेळी मुख्य पेंडॉलमध्ये स्टेज तयार करण्याचे काम सुरू होते. तसेच सेमिनारसाठी येणाऱ्या सहजयोग्यांची व्यवस्था करण्याची कामे सुरु होती.

फेलिसिटेशन प्रोग्राम - २०.३.२००८

आजच्या दिवसाची सुरवात सकाळी ६.०० च्या सुमारास सामूहिक ध्यानाने झाली. दहाच्या सुमारास

श्रीमाताजींचे दर्शन घेण्यासाठी केंद्रीय व्यापार मंत्री श्री कमलनाथ आले. त्यांनी श्रीमाताजींच्या पाया पडून त्यांचे आशीर्वाद घेतले.

त्यानंतर ११.०० च्या सुमारास मुख्य पेंडॉलमध्ये हवनाचे आयोजन केले होते. साधारण तासभर हवन झाले त्यावेळी हवनामध्ये श्री रोमेलसाहेब व श्री आनंदभैय्या यांनी भाग घेतला. त्यानंतर श्रीमाताजींची आरती झाली. आरतीनंतर बराचवेळ गाणी चालली होती.

संध्याकाळी ४.०० च्या सुमारास पाऊस सुरू झाला, थोड्यावेळाने वातावरण अतिशय आल्हाददायक झाले. साधारण ७.३० च्या सुमारास कार्यक्रमाची सुरवात झाली. त्यामध्ये एनजीओ च्या मुलांनी कार्यक्रम सादर केला. त्यानंतर श्रीमाताजींचे ९.०० च्या सुमारास मुख्य पेंडॉलमध्ये आगमन झाले. त्यावेळी त्यांच्यासोबत श्रीपापाजी, सौ कल्पनादीदी, सौ साधनादीदी, श्री रोमेल साहेब व श्री आनंदभैय्या होते. श्रीमाताजींची आरती झाली. त्यांच्या चरणावर हार अर्पण केला. श्रीमाताजींच्या सर्व कुटुंबियांचे स्वागत केले.यानंतर मध्यप्रदेश शासनाचे मंत्री 'श्री विजय कैलास वर्गिस' सहकुटुंब आले होते, त्यांचे स्वागत केले. श्रीमाताजींसाठी वाढदिवसानिमित्त आलेले जगभरातील काही संदेश वाचून दाखविणात आले. भारताच्या राष्ट्रपती, अमेरिकेच्या राष्ट्रपतीचा संदेश होता. त्यानंतर मंत्री साहेबांनी भाषण केले. डॉ. उदवाणी यांनी कविता वाचून दाखविली. शेवटी श्री रोमेल वर्मा व श्रीपापाजींनी छोटेसे भाषण केले.

श्री गुलाम मुस्ताफा आली खान आणि सहकारी गायला बसले. त्यांनी प्रथम हॅपी बर्थ डे श्रीमाताजी, रघुपती राघव, गोपाला साई नंदलाला ही भजने सादर केली. त्यावेळी स्टेजच्या समोरून सर्व देशांच्या प्रतिनिधींनी बोर्ड घेऊन परेड केली. त्यानंतर मंत्रीमहोदय यांनी स्वत: उभे राहून भजन सादर केले. त्यानंतर दुसरे मंत्रींचे आगमन झाले.त्यांचे स्वागत करण्यात आले. श्रीमाताजी आपल्या निवासस्थानी परतल्या. त्यावेळी रात्रीचे ११.०० वाजून गेले होते. स्टेजवर श्री गुलाम मुस्ताफा आली यांनी अनेक भजने सादर करीत शेवटी दमादम मस्त कलंदर हे भजन सादर करताना मंत्री महोदय यांनी सर्वांबरोबर नृत्य केले.रात्री १२.०० च्या सुमारास श्रीमाताजींच्या 'निर्मल स्थान' याठिकाणी केक कापण्यात आला.

### वाढदिवस पूजा - २१.३.२००८

आजच्या दिवसाची सुरवात सकाळी ६.०० सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर ११.०० च्या सुमारास श्री अरुण आपटे व सौ सुरेखा आपटे यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी म्युझिक थेरपीच्या कार्यक्रमात सर्व चक्रांचे राग सादर करीत सर्वांना ध्यानाचा आनंद दिला. सदर कार्यक्रम १.३० च्या सुमारास संपला.

संध्याकाळी श्रीमाताजींची पूजा असल्याने सर्वजण लवकरच पेंडॉलमध्ये जमले होते. साधारण ७.३० च्या सुमारास कार्यक्रमाची सुरवात झाली. त्यावेळी सुरवातीला भजने झाली. श्रीमाताजींच्या जीवनावर बनविलेली एक फिल्म पडद्यावर दाखविण्यात आली. त्यानंतर श्रीमाताजींचे आगमन झाले. श्रीमाताजींची आरती झाली. त्यांच्या चरणावर हार अर्पण करण्यात आला. श्रीमाताजींच्या चरणाची लहानमुलांनी फुले वाहून पूजा केली. श्रीमाताजींना सौ कल्पनादीदी व सौ साधनादीदींनी सजविले. त्यानंतर त्यांना महाप्रसाद दाखविण्यात आला. जगभरातील प्रमुखांनी आरती केली. श्रीमाताजींच्या समोर केक मांडण्यात आला . श्रीमाताजींनी श्रीपापाजींच्या मदतीने केक कापला. श्रीमाताजींनी सौ कल्पनादीदीच्या मदतीने श्रीपापाजींना केक भरवला.

आज होळी चा दिवस असल्याने श्रीमाताजींच्या चरणावर रंग वाहण्यात आले. श्रीमाताजींना श्रीपापाजींना, सौ कल्पनादीदी व सौ साधनादीदींनी रंग लावला. श्रीपापाजींनी सर्वांना रंग लावला. त्याचवेळी संपूर्ण पेंडॉलमध्ये रंगाच्या पुड्या वाटण्यात आल्या होत्या. श्रीमाताजींचे आपल्या निवासस्थानी प्रस्थान झाले. त्यानंतर होळी प्रज्वलीत करण्यात आली. त्यावेळी सहज गायकांनी अनेक भजने सादर करून सर्वांना नाचवले. बाजूला थंडाईची व्यवस्था केली होती. सर्वांना महाप्रसाद व गिफ्ट देण्यात आले.

### २२.३.२००८

आजच्या दिवसाची सुरवात सकाळी ६.००वा. सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर ११.०० च्या सुमारास वेगवेगळ्या सेंटरच्या सहजयोग्यांचे गाण्याचे व नृत्याचे कार्यक्रम झाले. दुपारी ३.०० च्या सुमारास मेडिकल सेमिनारचे आयोजन केले होते. त्यामध्ये डॉ निगम व डॉ रॉय यांनी सर्व सहजयोग्यांच्या प्रश्नांची उत्तरे, सहजयोगाची माहिती दिली. सदर कार्यक्रम अतिशय सुंदर झाला.

संध्याकाळी ७.०० च्या सुमारास भजनाचा कार्यक्रम झाला.

त्यामध्ये हैद्राबाद, गुजराथ व पुणे ग्रुपची भजने व नृत्यं झाली. त्याचवेळी पावसाची सुरवात झाली. त्यावेळी स्टेजवर श्री मुखिराम यांनी माईक शिवाय भजने सादर करून पावसात सर्वांना नाचवले. रात्री ११.३० च्या सुमारास कार्यक्रम संपला.मुख्य पेंडॉलमधील सर्व संगीत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री धनंजय धुमाळ यांनी पाहिले.

दोन महिन्यांपूर्वी ज्यांनी छिंदवाडा सेमिनारच्या ठिकाणी भेट दिली होती त्यांनी त्यावेळी जाताना जवळपास ४०-५० ठिकाणी रस्त्याची कामे चालू असल्याचे पाहिले होते. श्रीमाताजी येईपर्यंत रस्ते ठीक होतील का याबाबत त्या सर्वांना शंका वाटत होत्या. तसेच सेमिनारच्या ठिकाणी अतिशय कठीण जमीन असल्याने श्रीमाताजींचे 'निर्मल स्थान' निवासस्थान पूर्ण होण्याबाबत शंका वाटत होती. ही सर्व कामे केवळ ४० दिवसांत श्रीमाताजींच्या कृपेत पार पडली. तसेच छिंदवाड्याचे तपमान या दिवसात ४०-४५ डिग्री असते ते यावेळी २५ डिग्रीपर्यंत खाली आले होते. तसेच या दिवसात त्याभागात कधीही पाऊस पडत नाही तो यावेळी पाऊस पडल्यामुळे सर्वजण आश्चर्यचकित झाले होते. तसेच राहण्याची, जेवणाची फारच सुंदर व्यवस्था केली होती. स्टेजचे डेकोरेशन अतिशय भव्य असे होते.

### श्रीमाताजींचे नागपूरकडे प्रस्थान- २३.३.२००८

आजच्या दिवसाची सुरवात सकाळी ६.००वा. सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर साधारण ११.०० च्या सुमारास सेमिनारच्या ठिकाणापासून श्रीमाताजी नागपूरकडे निघाल्या. त्यावेळी श्रीमाताजीं परत छिंदवाडा जन्मस्थान पहाण्यासाठी जन्मस्थानाकडे आल्या. श्रीमाताजींनी पुढच्या बाजूने व मागच्या बाजूने गाडीत बसूनच जन्मस्थान परत एकदा पाहिले आणि त्या नागपूरकडे निघाल्या. इकडे मुख्य पेंडॉलमध्ये दुपारी आदल्या दिवशी झालेला मेडिकल बाबतच्या डॉक्टरांच्या माहिती देण्याचा कार्यक्रम सुरू होता. श्रीमाताजीमध्ये साधारण ४.०० च्या सुमारास हॉटेलवर पोहचल्या. येताना सुधारणा झालेले नागपूर शहर पाहून त्या खूपच खुष होत्या.

## श्रीमाताजींसोबत सहजयोग्यांना लाभलेला स्वर्गीय विमानप्रवास.

१७ मार्च रोजी छिंदवाडा पूजेला जाण्यासाठी श्रीमाताजी पुणे विमानतळावर साधारण ५.०० च्या सुमारास पोहचल्या. त्यांच्या सोबत श्रीपापाजी व श्री आनंदभैय्या होते. विमानतळावरील आरामकक्षात श्रीमाताजींनी थोडावेळ विश्रांती घेतली. त्यानंतर ६.०० च्या सुमारास श्रीमाताजी, श्रीपापाजी व श्री आनंदभैया सोबत १४० सहजयोगी नागपूरच्या प्रवासासाठी श्रीमाताजींसोबत विमानात बसले. श्रीमाताजी पुढच्या बाजूला बसल्या होत्या. श्रीमाताजींनी थोडे खाल्ले. सहजयोग्यांनी आणलेला प्रसाद दाखविण्यात आला.त्यातील पेढ्यांचा प्रसाद श्रीमाताजींनी व्हायब्रेट केला. सर्व विमानातील सहजयोग्यांना प्रसाद वाटला. श्रीमाताजींनी व्हायब्रेट केलेले पाणी सर्वांना दिले. साक्षात आदिशक्तीच्या सहवासात असल्यामुळे सर्वत्र प्रचंड चैतन्य जाणवत होते. प्रत्यक्ष स्वर्गात श्रीमाताजींच्या सोबत असल्याचा भास सर्वांना होत होता. स्वर्गीय आनंदात असतानाच विमान नागपूर विमानतळावर पोहचले.त्याठिकाणी श्रीमाताजींच्या बरेच सहजयोगी जमले होते. बाजूला सनई-चौघडा, बॅन्डचे पथक होते, फुलांची आरस केली होती. रांगोळ्या स्वागतासाठी काढल्या होत्या. अत्यंत प्रसन्न वातावरणात श्रीमाताजी विमानतळावर ७.३० चा सुमारास आलेल्या गाडीत बसल्या.

दिनांक २४ मार्च रोजी श्रीमाताजी नागपूर विमानतळावर साधारण ११.३० च्या सुमारास आल्या. त्यावेळी त्यांची गाडी विमानाशेजारी धावपट्टीवर उभी केली. श्रीमाताजी अत्यंत प्रसन्न व आनंदी दिसत होत्या. विमानात श्रीमाताजी बसल्या त्यावेळी सर्वत्र प्रचंड चैतन्यमय वातावरण तयार झाले होते. श्रीमाताजींसोबत श्रीपापाजी होते. श्रीमाताजी पुढच्या बाजूला बसल्या त्यांच्या सोबत १४० सहजयोगी बसले होते. पेढ्याचा प्रसाद सर्वांना वाटण्यात आला. विमान सुरू झाल्यानंतर सर्वांना, श्रीमाताजींनी, 'महामाया महाकाली' हे भजन म्हणायला सांगितले.नंतर 'जागो हे जगदंबे जागो' हे भजन सर्वांनी म्हटले त्यावेळी सर्वांना स्वर्ग म्हणजे काय असतो त्याची जाणीव होत होती.साधारण १.०० च्या सुमारास श्रीमाताजींचे विमान पुणे विमानतळावर पोहचले. त्यानंतर श्रीमाताजी प्रतिष्ठानकडे निघाल्या.

● ● ●

## ईस्टर पूजा संदेश

(सारांश) मैगलानो, इटली.
११ एप्रिल, १९९३



*आत्मसाक्षात्कारी व्यक्तीसाठी हे आवश्यक ठरते की त्यांनी अंतर्मुख झाले पाहिजे. दुसऱ्यांचे दोष पाहण्याऐवजी त्याने स्वतःचे दोष पाहिले पाहिजेत. आध्यात्मिक पातळी तुम्ही किती गाठली, याची जाणीव तुम्हाला व्हायला हवी.*

सहजयोगात येऊन तुमच्यामध्ये परिवर्तन झालेले आहे. मी असं म्हणेन की तुमच्या कुंडलिनीने हे कार्य केले आहे. परंतु अजूनही तुमच्यात आणि ईसामसीमध्ये अंतर आहे. आपण ज्या वातावरणातून अथवा जीवनशैलीतून इकडे येता, ती फार घातक आहे. जर आपण पहाल तर सर्व काही आपल्यासाठी विनाशकारी होते. आता तुम्ही यातून मुक्त होत आहात, तरीही कुठेतरी या गोष्टींचा पगडा अजूनही आहे. या गोष्टींचा प्रभाव अजूनही तुमच्यावर पडतो. कधी कधी उच्च स्थिती प्राप्त करून देखील तुम्हाला असं जाणवतं की कुठल्यातरी निरर्थक, हास्यास्पद अशा गोष्टीमध्ये तुम्ही गुंतत जाता निश्चितपणे तुम्हालाही त्याबाबत आश्चर्य वाटतेच ! कधी कधी तुम्ही हे सर्व मान्यही करता.

आत्मसाक्षात्कारी व्यक्तीसाठी हे आवश्यक ठरते की त्यांनी अंतर्मुख झाले पाहिजे. दुसऱ्यांचे दोष पाहण्याऐवजी त्याने स्वतःचे दोष पाहिले पाहिजेत. आध्यात्मिक पातळी तुम्ही किती गाठली, याची जाणीव तुम्हाला व्हायला हवी. इसामसीला हे सर्व करण्याची आवश्यकताच नव्हती. त्यांना तर अंतर्मुख होण्याची देखील जरूर नव्हती. ते या सगळ्याच्या पलीकडे होते. मृत्यू व नंतर पुनर्जन्म हे त्यांच्यासाठी केवळ एक शारीरिक परिवर्तन होते. पण आपल्यासाठी हे पूर्णतया वेगळे आहे. आता आपण सर्व सहजयोगी आहोत. परंतु त्याआधी आपण सामान्य लोक होतो आणि तेव्हा आपल्यामध्ये प्रकाश नव्हता. आता आपल्यात प्रकाश आला आहे. आता आपल्याला स्वतःलाच प्रकाश बनायचे आहे. ईसामसींना अस बनावं लागलं नाही.

आता तुम्हाला सावध रहायला हवं की जेणेकरून या प्रकाशात बाधा येणार नाहीत. हा प्रकाश कमी व्हायला नको अथवा नाहीसा व्हायला नको. या प्रकाशातच रहाण्याची आवश्यकता आहे. जर त्यात गडबड असली तर तुम्ही अजून पूर्णतया प्रकाश बनला नाहीत. तेव्हा तुम्हाला प्रकाशमयी व्हायचे आहे. जेव्हा तुम्ही स्वतःच प्रकाशमयी व्हाल, तेव्हा तुम्ही कशाप्रकारे कार्यरत व्हाल हे तुम्ही अनुभवाल.कोणत्या गोष्टीमुळे तुमच्या उत्थानात अडथळा येतो आहे? की तुमच्या जुन्या वाईट सवयींमुळे अडथळा येतो आहे? आता क्षणोक्षणी आपणच आपले रक्षण करायचे आहे आणि हे पहायचे आहे की आपण आपली उन्नती किती केली आहे? खरोखरीच ही एक अतिसुंदर अशी यात्राच आहे. कशाप्रकारे आपण अशी श्रद्धा मिळवता? त्यासाठी कोणताही अभ्यासक्रम असा नाही किंवा कोणते साहित्यही उपलब्ध नाही. परंतु आपल्यामध्ये जी जागृती होते, त्यामुळेच आपल्याला प्रश्न पडेल की मी कोण आहे?मी काय प्राप्त केले आहे? माझे ध्येय काय आहे? सहजयोगातून मला काय मिळाले? हे सर्व प्रश्न आपल्या मनात येतील. पण जर तुमचा विश्वास प्रकाशित असेल तर छोट्या छोट्या गोष्टींमधून आपल्याला अनुभव मिळतील. तेव्हा तुमचे तुम्हालाच जाणवेल की आपण आता खरा सहजयोग अनुभवायला लागलोय !

उदा. जर अचानक पाऊस येऊ लागला तर आपण चिंतीत व्हाल. पण तुमच्या लक्षात येईल की, तुमच्यावर एखादे आच्छादनच असेल की ज्यामुळे तुम्हाला काहीही होणार नाही. कितीही पाऊस पडो! आपल्याला विश्वास निर्माण होईल की तुम्ही अजिबात

## ईस्टर पूजा, नागपूर, २३ मार्च २००८







वाढदिवस पूजा, छिंदवाडा











श्री गणेश जयंती, प्रतिष्ठान, १४ मार्च २००८







गुढीपाडवा पूजा, ६ एप्रिल २००८



ओले न होता सुरक्षित आहात. याप्रकारे आपल्यामध्ये असा विश्वास दृढ व्हायला हवा. असा दृढ विश्वास आपल्याला अशी गहनता प्राप्त करवून देतो की ज्यामुळे हजारो लोकांमध्ये परिवर्तन घडून येणे शक्य होते.आपण हे समजायला हव की आपल्यामधील स्थिरता, समजूतदारपणा व आत्मपरीक्षण करण्याची शक्ती यामुळेच आपण सहजयोगात एक स्थिती मिळवू शकतो. आणि हे होतं. आपल्या सर्वांमध्ये हे घटीत व्हायला हवं. तुम्हाला सर्वांना तुमच्यातील -स्व-ला जाणण्याचा म्हणजेच आत्म्याला जाणण्याचा योग प्राप्त झाला पाहिजे.व्यक्तीचा तिच्या स्वत:वर विश्वास असायला हवा. माझ्या असं लक्षात आलंय की बरेच सहजयोगी असं म्हणतात की, श्रीमाताजी माझ्यात काही गुण नाहीत, मी बेकार आहे मी काहीच कामाचा नाही.पण तुमच्या असं लक्षात येईल चित्त जेथे पोहोचते तेथे कामे होतात. याचं कारण हे सर्वव्यापी परमचैतन्यच सर्व घडवून आणते. बाकी सर्व व्यर्थ आहे. ही शक्ती इतकी कार्यप्रवीण आहे आणि विलंब न लावता तिचे कार्य होते.

आत्मसाक्षात्कार मिळाल्यावरदेखील विश्वास नसणं यावरून हे दिसून येतं की आपले व्यक्तिमत्त्व किती दुर्बल आहे! आश्चर्याची गोष्ट आहे, की आत्मसक्षात्काराच्या नंतरही लोकांमध्ये आत्मविश्वास नसतो. ज्यांच्यात आहे त्यांनी खूप काही मिळवलंय! तुमच्यात आणि इसामसीत अंतर आहे की विश्वास हा इसामसीच्या नसानसातून भरलेला होता. ते स्वत:च एक विश्वास होते.आपला स्वत:चा स्वत:वरच भरवसा असायला हवा. रुमानियामध्ये एका स्त्रीला व्हिलचेअरवरून माझ्याजवळ आणण्यात आहे. ती अजिबात चालू शकत नव्हती. ती मला म्हणू लागली, श्रीमाताजी माझा विश्वास आहे की तुम्ही मला बरे करणार आहात. मी म्हटले, जर तुला तसा विश्वास वाटतोय, तर उभे रहा ! आणि काय आश्चर्य! ती उभी राहिली आणि व्यवस्थितपणे चालू लागली. तुमचा जर विश्वास असेल तर सर्व देवता सहाय्य करतात.

## डोळे

जर आपले डोळे अस्थिर असतील तर आपले आज्ञाचक्रही अस्थिर असेल. त्यासाठी आपले डोळे स्थिर असले पाहिजेत. डोळ्यांसाठी सर्वात चांगले म्हणजे हिरवे गवत-हरळी व ती पाहण्यासाठी आपल्याला आपली नजर जमिनीवर ठेवून चालायला पाहिजे

– आज्ञा चक्र प्रवचन कॅक्स्टन हॉल, लंडन (१८-१२-७८)

सहजयोगात मी असे पाहिले आहे की आजकाल काही लोकांनी आपले आज्ञाचक्र खराब करून घेतले आहे. याचे कारण हे आहे की ते लोक अयोग्य गुरुंना मानतात किंवा अयोग्य ठिकाणी नमस्कार करतात; अथवा आपले मस्तक टेकवतात. बरेचसे डोळ्यांचे आजार हे अशा चुकीच्या आचरणामुळे होतात

– मुंबई २६.९.१९७९-निर्मल योग

डोळे स्वच्छ, निरोगी राहण्यासाठी काजळ घातले पाहिजे. साधे काजळ तयार करण्यासाठी आपण काय करावे? थोडासा कापूर जाळला जातो आणि त्याची काजळी चांदीच्या ताटलीवर केंद्रीत केली जाते. चांदीची ताटली जेव्हा थंड होते, तेव्हां त्या काजळीमध्ये थोडेसे लोणी अथवा शुद्ध तूप (साजूक तूप)घालून घोटून घोटून मिसळले जाते. साजूक तूप जास्त चांगले असते. तूपात घोटून झाल्यावर त्यात स्वच्छ पाणी घालावे. त्यात थोडा वेळ काजळ स्वच्छ होण्यासाठी ठेवून देणे. नंतर ते निथळत ठेवणे. पाण्याचा अंश सगळा निघूनच जाईल. कारण साजूक तुपाला पाणी चिकटणारच नाही. नंतर ते काजळ एका योग्य डबीत ठेवावे व विशुद्धीच्या बोटाचा उपयोग काजळ लावायला करणे.रोज लहान मुलांना अंघोळीनंतर काजळ घातले पाहिजे. त्यांनी त्यांची नजर चांगली होईल; व दीर्घ काळापर्यंत डोळ्यांची तक्रार होणार नाही.

-माताओ और बच्चो को उपदेश १९८३

जर मागचे आज्ञाचक्र खराब असेल तर याचा अर्थ असा आहे की निश्चितपणे आपण भूतबाधीत आहात. मागचे आज्ञाचक्र खराब झाल्यावर व्यक्तीला डोळे उघडे ठेवून सुद्धा दिसत नाही. अशाप्रकारचे आंधळेपण येऊ शकते. अजून एक गोष्ट, स्वाधिष्ठान चक्र खराब असते, तेव्हा त्याचा परिणाम मागच्या आज्ञाचक्राच्या सभोवताली होतो.

– आज्ञा चक्र ,दिल्ली ३.२.८३ निर्मल योग

मी गेल्या पाच वर्षापासून चष्मा वापरते कारण आपल्या कार्यक्रमामध्ये तासन्तास दिव्यांचा प्रखर प्रकाश डोळ्यांवर येतो.

एक महत्त्वाची बाब म्हणजे आपले वाढते वय लक्षात घेणेही गरजेचे असते, सभोवतालचे वातावरण, प्रदूषण, या सर्व गोष्टींचा देखील डोळ्यांवर परिणाम होत असतो. चष्मा लावणे हा कोणत्याही प्रकारचा आजार नव्हे-डॉक्टरांची कॉन्फरन्स, दिल्ली. २५.३.१९९३

## आत्मप्रकाश

निर्मल योग ५.६.१९९३



*आजपासून आपण सहजयोग हा त्यात पूर्णतया उतरून त्यात गहनता प्राप्त होण्याच्या दिशेने जाऊया; आणि यासाठी कुठलेही उच्चशिक्षण अथवा उच्चपदस्थ असण्याची जरुरी नाही.*

*जे लोक नियमितपणे ध्यानधारणा समर्पणभावाने करतात, गहनतेत उतरतात, एखाद्या विशाल वृक्षाप्रमाणे विकसित होतात ते खरोखर इतरांसाठी आदर्श बनून राहतात.*

आपले माता-पिता कोण आहेत आपली पत्नी कोण आहे, पती कोण आहे, शिव या गोष्टी जाणत नाहीत. कारण त्यांचे ठायी अद्वैतभाव असतो. द्वैतावस्थेमध्येच आपण म्हणतो, माझे,माझे,याप्रमाणे अंध:कारात बुडून जातो. जोपर्यंत तुम्ही म्हणता की-माझे, माझे तोपर्यंत द्वैतभावना असते.परंतु शक्ती म्हणजेच शिव आहे व शिव म्हणजेच शक्ती होय! कोणतेही द्वैत नाही. पण तुम्ही संपूर्ण जीवनच द्वैतामध्ये राहता आणि म्हणूनच मोह होतो. जर तुम्हीच प्रकाश आहात आणि तुम्हीच दीपक आहत, तर द्वैत उरले कुठे? तुम्हीच जर चंद्रही आहात, चांदणी पण तुम्हीच आहात तर द्वैत कुठले? सूर्य व सूर्याची उर्जा तुम्हीच आहात, शब्द तसेच शब्दाचा अर्थही तुम्हीच आहात तर द्वैतभावना आहेच कुठे?

पण जेव्हा संश्लेषण केले जाते तेव्हा द्वैतभावना येते. आणि त्यामुळेच आपल्याला मोह होतो. कारण जर वेगळे नसालच तर मोहात अडकालच कसे? तुम्ही त्या शक्तीपासून वेगळे राहता म्हणूनच तुम्ही मोहात फसता. परंतु सर्वकाही माझेच स्वरूप आहे. माझ्यापेक्षा भिन्न असे काय आहे? मीच सर्वत्र व्यापून राहिले आहे. जेव्हा तुमचा आत्मा प्रकाशित होईल व जेव्हा तुम्ही विराटाचे अंगप्रत्यंग बनून रहाल तेव्हांच तुम्ही हे सर्व अनुभवाल. उदा. अथांग सागरामध्ये जर थोडासा रंग मिसळला तर त्या रंगाचे अस्तित्वच विरून जाईल. जेव्हा हा आत्मरुपी प्रकाश परमात्म्याबरोबर एकरूप होतो त्यावेळी द्वैतभावना उरतच नाही. आणि मग मात्र ज्यागोष्टी आपल्या संपर्कात येतात त्या सर्व आध्यात्मिक बनून जातात.

आपली बुद्धी सीमित असते. पण आत्म्याची शक्ती ही सागराप्रमाणे अथांग असते. म्हणूनच आपल्यामध्ये अलिप्तता आली पाहिजे. म्हणजे बुद्धीच्या पलीकडे जाऊन जेव्हा तुम्ही या आत्मसागरात डुंबता तेव्हा खरी मजा येते. आत्मप्रकाश हाच आत्म्याचा रंग होय! हा प्रकाशच कार्य करतो, विचार करतो, सहजयोग करतो. सर्व काही हा प्रकाशच करतो. म्हणूनच आज मी शिवतत्त्व तुमच्यात जागृत करण्याचा निर्णय घेतला. मी तुम्हा सर्वांच्या बरोबरच आहे. म्हणजे एकप्रकारे तुम्हाला कुठलीही पूजा करण्याची आवश्यकताच उरणार नाही. पण त्या अवस्थेपर्यंत तुम्हाला पोहचायला लागेल आणि ती अवस्था मिळवण्यासाठी आपल्याला पूजा करण्याची आवश्यकता आहे.

मला आशा आहे की आपल्यापैकी बरेच जण लवकरच हे सर्व आत्मसात करतील. पण हे सर्व कष्टप्रद आहे अस समजू नका. हे उत्थान हे सहज आहे. जेव्हा तुम्हाला हे समजेल की ह्यातूनच खरा आनंद प्राप्त होतो आहे, तेव्हाच तुम्ही खरी निरानंद अवस्था प्राप्त करू शकाल. तुमच्या आईचं नावही निरा आहे. त्यातच सर्व आले. (निरानंद) आपल्या आत्म्याचा प्रकाश आपल्या मेंदूत आणण्याची माझी इच्छा आहे. परंतु आपले चित्त दुसरीकडेच भटकतच असल्यामुळे कधीकधी मला हे करणं कठीण होऊन बसते.तेव्हा स्वत:ला अलिप्त करण्याचा प्रयत्न करा. क्रोध,वासना,लोभ यांसारख्या गोष्टी टाळण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी आपल्या मनावर ताबा मिळवा. मला माहीत आहे की आपल्यापैकी काहीजण हे तितकेसे कार्य करणार नाहीत.पण मी त्याविषयी तुम्हाला परत परत सांगत राहणार आणि मार्गदर्शन, सहाय्य करतच राहणार. ● ● ●

काही भारतीय मसाल्यांचे उपयोग,दिनांक २६ ऑगस्ट १९९२ रोजी श्रीमाताजींनी काही भारतीय मसाल्यांविषयी तसेच इतर पदार्थांविषयी आरोग्यदृष्ट्या काही हितकारक माहिती देऊन आपल्याला उपकृत केले.

| पदार्थाचे/वस्तुचे नाव | | कशासाठी हितकारी |
|---|---|---|
| धने | : | दात,लिव्हर (यकृत) |
| कोथिंबीर | : | शरीरकी सुगंधको प्राकृतिक रुपसे नियमित करते है। |
| जिरे | : | दात आणि लिव्हर (धने,जिरे व ओवा हे वायुविकारावर गुणकारी) |
| हळद | : | त्वचा विकार व लिव्हर |
| आले | : | लिव्हर |
| लसूण | : | उच्च रक्तदाब आणि हृदयरोग (लसूणाला भुते घाबरतात) |
| तुळस | : | विशुद्धीसाठी (संपूर्ण विश्वातच उपयोग केले जाणारे शाश्वत रोप. श्रीकृष्णांना ही खूप आवडते. तुळशीच्या एका पानामध्ये एक काळी मीरी घालून रोज घेतल्यास खोकला जातो) |
| काळी मिरी | : | उष्णता देते |
| गरम मसाला | : | उष्मा प्रदान करते.गरम मसाला हे जवळजवळ एक डझन मसाल्याच्या पदार्थांचे मिश्रण असते. |
| मिरची | : | क -जीवनसत्त्व बद्धकोष्ठावर गुणकारी |
| कांदा | : | अ- जीवनसत्त्व, हृदयासाठी गुणकारी |
| लिंबू | : | क-जीवनसत्त्व |
| सुखी मच्छी | : | बद्धकोष्ठावर गुणकारी.(परंतु लिव्हरसाठी लाभदायक नाही) |
| मन्जनी फूल | : | अत्यंत शीतल -कैलाश जीवनप्रमाणे |
| वेलची | : | अत्यंत थंड(साल खाता कामा नये)वेलची दाणे गरम मसाल्यात किंवा चहाला संतुलित करण्यासाठी वापरतात. |
| सफेद पनीर | : | खूप चांगले व हलके- लिव्हरसाठी लाभदायक |
| पिवळे पनीर | : | ठीक. परंतु लिव्हरसाठी हानीकारक |
| सडलेले पनीर | : | बिलकूल खाऊ नये. लिव्हर तसेच मूलाधार चक्राला हानिकारक असते (दुर्गंधी) |
| तेल,तूप | : | शुद्ध तेल अथवा शुद्ध तुपाचा उपयोग करा. स्वयंपाकासाठी शुद्ध तूप सर्वोत्तम ठीक असतात. पण याच्या बियांमुळे वृद्ध लोकांमध्ये किडणी स्टोन होऊ शकतो |

आहाराविषयी अन्य मुद्दे

ग्रीष्म ऋतुमध्ये आंबट पदार्थांचा वापर अधिक करावा. तरी असलेला स्वयंपाक किंवा चटण्या उदा-कोथिंबीर, पुदिना, हिरवी मिरची, लसूण, आले यापासून बनवलेल्या हिरव्या मसाल्याचा वापर करा.दुसरा असा निसर्गाचा नियम आहे की, उष्णतेमुळे उष्णता मारली जाते. उष्ण प्रदेशांमध्ये लोक अधिक मिरच्या किंवा गरम मसाल्याचा उपयोग करतात. त्यामुळे अधिक प्रमाणात घाम येऊन जातो व शरीर शीतल बनते.अनेक लोक बंद डब्यातील पदार्थ खातात. अशा प्रकारचे जेवण हे आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक असते. ताजे अन्न खाण्याला प्राधान्य दिले गेले पाहिजे.

-निर्मल योग- खंड -५

## श्रीमाताजींना वेळोवेळी विचारलेल्या प्रश्नांबाबत दिलेली माहिती

संदर्भ:-निर्मल सुरभी

**प्रश्न : – सहजयोग आणि रेकी मध्ये काय फरक आहे किंवा ते परस्पराशी समांतर आहेत?**

**श्रीमाताजी:–** मी कोणत्याही गोष्टीवर टिका करीत नाही, केवळ इतके बघते की कोणत्या गोष्टीपासून तुम्हाला काय मिळाले?आपल्याला आत्मसाक्षात्कार मिळाला का? का आपल्याला परमात्म्याचे ज्ञान प्राप्त झाले का? आपण शीतल लहरी प्राप्त केल्या का? याप्रकारे आई होण्याच्या नात्याने मी म्हणते, तुम्हाला यापासून काय मिळाले?बाजारात खूप लोक आहेत, खूप लोक. मी तुम्हाला हा प्रश्न विचारते बाळा, तुला काय मिळाले? या गोष्टींना काही शेवट नाही.

**प्रश्न :– काही रोगमुक्त करणारी शक्ती आहे, जी आज रात्री ध्यान धारणा करून मिळेल का?**

**श्रीमाताजी :–** होय, सर्व प्रथम व्यक्तीला माहीत व्हायला हवे की शक्ती काय आहे. तुम्ही समजाल,ही लोकांना रोगमुक्त करते, यात काही शंका नाही. प्रथम ती तुम्हाला रोगमुक्त करील आणि नंतर अन्य लोकांना रोगमुक्त करील यात शंकाच नाही, हे असेच घडते. मी जाणीत नाही की कुंडलिनी योगाच्या तत्त्वावर लोक काय करतात?

**प्रश्न :– आपण जो कुंडलिनी योग शिकवता, याचा तंत्र योगाशी संबंध आहे का?**

**श्रीमाताजी :–** हे बघा, नाव कुंडलिनी योग आहे, परंतु मी तुम्हाला सांगते की, याचे कुंडलिनीशी काही देणे-घेणे नाही. जर तुम्ही शब्दार्थ पाहिला तर, सहजयोग आणि कुंडलिनी योग एक सारखे वाटतात. परंतु वास्तवात मी बघितले की हा कुंडलिनी योग भयानक आहे. यामुळे लोकांना फार त्रास सहन करावा लागला. हा पूर्ण वेगळा आहे. कुंडलिनी योगाच्या नावावर ते काय करतात हे मी जाणले नाही.

**प्रश्न :– काय आपण मानता की कुंडलिनी ही जीवनदायिनी शक्ती आहे, जे चिनी नावाने ओळखतात,जी आमची अंश आहे, विश्वाचा एक अंश आहे, जिच्यापर्यंत याप्रकारे आपण पोहचतो किंवा Chi-Gong आणि Tai-chi च्या माध्यमातून देखील काय हीच ती शक्ती आहे?**

**श्रीमाताजी :–** होय, हे सत्य आहे.परंतु तुम्ही बघा, याचा त्यांच्याशी काही संबंध आहे आणि ते आहे आपला अहंकार व प्रतिअहंकार. चिनी लोकांनी जे लिहिले, ते ठीक आहे. परंतु चिनी लोक जाणीत नाही, लाओत्से कोण आहे? काय तुम्ही याची कल्पना करू शकता?लाओत्से अशी व्यक्ती होती, ज्याने याविषयी सांगितले , कुंडलिनीविषयी सांगितले. ते पण ओळखत नाहीत, लाओत्से कोण आहेत. अमेरिकेत, विशेष करुन मी नाही जाणीत की कोणत्या प्रकारचे चिनी रहातात. हा ज्ञानाचा महान स्रोत आहे. जे पण त्यांनी सांगितले पूर्ण सत्य आहे. परंतु सहजयोगात प्रत्येक गोष्टीचा समन्वय होतो. सर्व ज्ञान, सारे ग्रंथ, सर्व काही समन्वित होऊन जाते. पूर्ण समन्वित, कारण त्या प्रकाशात तुम्ही प्रत्येक गोष्टीत सत्य बघता. प्रत्येक गोष्ट सत्याला धरून आहे, प्रत्येक धर्मात सत्य आहे.

...प.पू.श्रीमाताजी, न्यूयार्क यू.एस.ए. १६.६.१९९९

**प्रश्न :– श्रीमाताजी कर्माविषयी काही सांगाल का?**

**श्रीमाताजी :–** फक्त माणूस मी कर्म करतो असा विचार करतो, प्राणी विचार करीत नाही. कारण आपल्यातील अहंकारामुळे आपण चुकीचे किंवा बरोबर करतो, प्राणी तसे करीत नाही. खरं तर माणसाला खरे का खोटे हे समजत नाही. कारण ते भौतिक जगात रहातात. परंतु खरे सत्य काय हे तुम्ही दैवी चैतन्यलहरीद्वारे जाणू शकता. जेव्हा तुम्ही दैवी कॅाम्प्युटर बनता, तेव्हा प्रत्येक जण तसेच विचार करू लागतात व खरे किंवा खोटे स्पष्ट होते. प्राणी माहीत नसल्याने घाणीत लोळतात.पण माणूस त्या टिकाणी जाणार नाही. जेव्हा तुम्ही संत बनता, खऱ्या खोट्यांची तुम्हाला जाण येते आणि तुम्ही काहीही चुकीचे करू शकत नाही. तुम्हाला नवीन प्रमाण प्राप्त होते.

अर्थात तत्पूर्वी तुमच्या अटींमुळे तुमचे व्यक्तीमत्त्व अहंकारातून बंदिस्त बनते. परंतु ख्रिस्त तुमच्या अटी आणि अहंकार शोषून घेतो. ख्रिस्त आपल्या पापांसाठी मृत्यू स्विकारतो,हेच तर कारण आहे. त्यासाठी तर ते जागृत आहेत. सेंट थॉमस यांनी सहजयोगाविषयी

तर सांगितले आहे सर्वव्यापी परमेश्वर, पिता जर एवढा प्रेमळ, करुणामय आहे, तर तो तुम्हाला यातना कशा देईल? त्यांनी म्हटले आहे, आपला पिता त्याच्या राज्यात आपल्याला नेण्यासाठी उत्सुक आहे. म्हणून तुम्ही आनंदी आणि सुखी रहा आणि दु:खाचे विचार सोडून द्या. तुम्ही दु:खी आणि दोषी समजू नका.

**प्रश्न:- सत्य जाणीवेच्या पलीकडे आहे काय?**

**श्रीमाताजी :-** होय, अर्थातच. कारण जर जे काही आपण जाणिवेतून ग्रहण करतो, ते जर सत्य असेल तर आपल्याला आणखी काही शोधण्याची गरज नाही. आपण जे आपल्या इंद्रियांद्वारे जाणून घेतो, ते वरवर आणि स्थूल आहे, सूक्ष्म नव्हे. या स्थूलाच्या खोलवर काय आहे, जे आपणाला जाणवत नाही. उदा. (ॲटम)अणू कसा तयार करावयाचा हे आपण सांगू शकत नाही. अमीबातून माणूस प्राणी कसा झाला, हे आपण सांगू शकत नाही. आपल्या जाणिवेतून आपण एखाद्या माकडाचे मनुष्यात रुपांतर करू शकत नाही. स्थूलाच्या खोलवर असणारे सूक्ष्म आपण संवेदनाच्या जाणीवेतून समजू शकत नाही. परंतु एकदा तुम्ही त्या पलीकडे गेलात तर जाणिवेतून त्याला जाणू शकता हा दुसरा मुद्दा आहे.

**प्रश्न:- श्रीमाताजी पायावरील चक्राची व्हायब्रेशन्स हातावरील बोटापेक्षा जास्त जाणवतात का?**

**श्रीमाताजी :-** समन्वय नाही, यामुळे तुम्ही सामूहिकतेत उतरले पाहिजे. शरीरासह सामूहिकतेत आले पाहिजे. म्हणूनच तुम्ही सामूहिकतेतील व्यक्ती नसाल,तर तुम्हाला तुमच्या पायावर, कधी हातावर, तर कधी डोक्यावर व्हायब्रेशन जाणवतील. ही चांगली गोष्ट नव्हे. तुम्ही समूहामध्ये जास्त जाण्याचा प्रयत्न करा. जास्त लोकांना भेटा. त्यांच्यात आवड निर्माण करा. तुमचे शरीर असे वापरले नाही तर कुशल कार्यासाठी त्याचा जास्त यशस्वी वापर होऊ शकत नाही.कारण व्यक्तीगतरित्या कार्य केले तर सामूहिकता कशी तयार होईल. कारण तुम्ही ती कुठे वापरणार? तुम्ही दुसऱ्यांना देण्याकरीता तुमच्यात सुधारणा करता आणि जर सामूहिकतेत न जाता तुम्ही दुसऱ्यांना समजले नाही तर देवाणघेवाण होणार नाही.उदा. तुम्ही एखाद्या झाडाचे फळ तोडले आणि ते बाहेर पिकवले, काही वेळाने ते लवकरच कुजून जाईल. परंतु जर झाडाला असताना नैसर्गिकरित्या परिपक्व झाले तर त्याला आणि झाडाला वेगळी शोभा येते. त्याची चवही छान येते. त्या वृक्षाला छायेखाली येणाऱ्यांनाही फळेही मिळतात. परंतु झाडापासून तोडलेले फळ जसे एकाकी पडून नाश पावते, तसेच सामूहिकतेपासून दूर गेल्यानंतर घडते.

**प्रश्न :- आई, विवेक कसा निर्माण करावयाचा?**

**श्रीमाताजी :-** विवेक हंस चक्रातून येतो. विवेकासाठी एक साधी गोष्ट आहे. थोडे तूप नाकात सोडा. जास्त भावनाशील होताना जास्त रडू नये. आपल्याकडे विशेष क्रिया करून रडण्याचा जास्त व्यापार करतात. मला देखील कधी रडावेसे वाटते, पण क्वचितच. माणसांनी पण कधी तरी रडलं पाहिजे.आता आत्मिक दृष्टया विवेक तयार होतो चैतन्यलहरींच्या जाणिवेतून, जेव्हा तुमच्या चैतन्यलहरी वाढतात तुमच्यात आपोआप विवेक जागृत होतो, तुम्ही एक मोठा कॅाम्प्युटर बनता आणि अपेक्षेप्रमाणे कार्य करता आणि मग तुम्हालाच आश्चर्य वाटते की तुम्ही कसे कॅाम्प्युटर सारखे आहात.

**प्रश्न :- आपल्याकडे शुक्लपक्ष आणि कृष्ण पक्ष आहे का?**

**श्रीमाताजी :-**चंद्र जेव्हा कलेकलेने वाढत जातो, तेव्हा शुक्लपक्ष आणि जेव्हा तो कमी कमी होत जातो तेव्हां कृष्णपक्ष असतो. म्हणून या कृष्णपक्षात काळ मंगलमय नसतो . मंगलदायक नसणे यावर काही उत्तर नाही. बस हे शुभ नाही. गॅसपासून प्रकाश तयार होतो. तो का तयार होतो, तुम्ही सांगू शकता का? कारण तो प्रकाश आहे.पण का? चंद्र जसा जसा वाढत जातो, तसतशी मांगल्याची शीतलता वाढत जाते. जी आत्म्याचे प्रतिनिधित्व करते. आत्म्याचे प्रतिबिंब वाढत्या कलाने येते. जेव्हा ते कमी होते तेव्हा ते मंगलमयी नाही असे आपण मानतो. म्हणून शुक्ल पक्ष व कृष्णपक्ष.

**प्रश्न :- चैतन्यलहरी (व्हायब्रेशन्स) म्हणजे काय?**

**श्रीमाताजी :-**आपल्यात असणाऱ्या सर्वव्यापी परमेश्वरी शक्तीचे अस्तित्व म्हणजे चैतन्यलहरी, ज्या आपल्या मध्यवर्ती मज्जासंस्थेतून

जाणवतात तीच व्हायब्रेशन्स. आत्मा स्पंदन पावत नाही. ज्या चैतन्यलहरी परमेश्वरी सर्वव्यापी शक्तीचक्राच्या असतात. परंतु तुमचा आत्मा तिच्याशी जोडला गेला तरच प्रवाहित होतात. आणि मग तुम्हाला मध्यवर्ती मज्जासंस्थेद्वारे व्हायब्रेशन्स जाणवू लागतात. आदिशक्तीच्या या चैतन्यलहरी आहेत.

**प्रश्न :-श्रीमाताजी आम्ही डॉक्टर हे ह्या लोकांना बरे करतो की त्यांचे ते बरे होतात? सहजयोगात डॉक्टरांचे कर्तव्य काय?**

**श्रीमाताजी :-** आयुष्यात महत्त्वाचा हेतू काय? तर परमात्म्याचे माध्यम होणे आणि तुमच्या प्रॅक्टीसमध्ये तुम्ही इतरांपेक्षा तुमच्या ध्यान धारणा अभ्यासामुळे जर तुमचा हेतू पेशंट बरे करण्याचा असेल तर ठीक, तुम्ही खूप जणांना बरे करू शकता. शल्य विशारद (सर्जन)अत्यंत यशस्वी झाले आहेत. कारण त्यांना व्यक्तीचे पूर्ण ज्ञान झालेले असते, एवढेच नव्हे, तुम्ही तुमच्या प्रक्टिसमध्ये अत्यंत निष्णात होता. अर्थातच तुम्हाला उपजीविकेसाठी पैसे मिळवावे लागतात. काही सहजयोगी असणाऱ्या डॉक्टरांचे चांगले चालले आहे.भारतात एम.डी. मिळविलेल्या डॉक्टरांना परदेशात संशोधनासाठी शिष्यवृत्ती मिळाली आहे.

**प्रश्न :-पांतजली सूत्रांपेक्षा सहजयोग वेगळा कसा आहे?पांतजली एवढा महान ग्रंथकर्ता लेखक आहे की त्याने एका वाक्यात लिहिले, तर इतरांना त्यासाठी पुस्तक लिहावे लागले, चित्तवृत्ती निरोध म्हणजे योग सहजयोगाची व्याख्या आपण कशी कराल?**

**श्रीमाताजी :-** पांतजली पेक्षा सहजयोग वेगळा नाही, त्यासारखाच आहे. पण लोकांना पांतजली समजून घेता येत नाही. ते फक्त सोळावा भाग वाचतात. खरे तर तुम्ही संपूर्ण अष्टांगयोग वाचले पाहिजे. त्यानंतर तुम्ही या निर्णयास येता की, तुम्ही आता निर्विचार स्थितीला येता, ज्याला निर्विचार समाधी म्हटले जाते हा सहजयोग आहे.

**प्रश्न :- जेव्हा मी निर्विचार स्थितीत असेन, तेव्हा मी स्पष्ट बघू शकत नाही का?**

**श्रीमाताजी :-** मला वाटते, तुम्हाला नेहमी पेक्षाही स्पष्ट दिसू लागते. ते बरोबर आहे. तुम्ही निर्विचार होता, तुमच्या डोळ्याच्या बाहुल्या मोठ्या होऊ लागतात. बरोबर आहे ना! कुंडलिनी वर चढवा. थोडीशी उंच चढवा, ठीक आहे?

जर कुंडलिनी या निर्विचाराच्या ठिकाणी थांबली म्हणजे फक्त डोळ्याच्या बाहुल्या मोठ्या झाल्या, डोळे काळेभोर झाले, परंतु त्यात ठिणगी नाही. परंतु जेव्हा कुंडलिनी त्यातून बाहेर येते, तुम्हाला डोळ्यात ठिणगी दिसते. डोळ्यात ताबडतोब फरक जाणवतो. आज्ञा चक्र कुंडलिनी जेव्हा नुकतेच भेदन करते तेव्हा डोळे मोठे होतात, बाहुल्या मोठमोठ्या होतात. तेव्हा तुम्हाला स्पष्ट दिसत नाही. या निर्विचार स्थितीत हे ठीक, बरोबर ! आता जर तुम्ही तिला थोडेसे वर ढकलले. तुमच्या चित्ताने तिला वर कसे ढकलावयाचे, हे तुम्हाला माहीत आहे, किंवा माझ्यात चित्त आणा, कुंडलिनी वर चढेल. ठीक आहे ना?

म्हणून निर्विचारता ही फक्त सुरुवात आहे. हा मोठा भाग आहे. श्रीकृष्णाच्या चक्रापर्यंत तुम्ही साक्षी होऊन जाता. आता तुमच्या डोळ्यात ढिणगी दिसते. ही तेजाची, चैतन्याची ठिणगी म्हणजे कुंडलिनी चांगली प्रवाहित झाल्याचे लक्षण होय. यावेळेला तुम्हाला नेहमीपेक्षा चांगले दिसू लागते. आणि सुरवातीला विशाल दिसू लागते, प्रत्येक गोष्ट स्पष्ट दिसू लागते ठीक आहे ना?

**प्रश्न :- अगुरुंविषयी आणि त्यांच्या संप्रदयांसंबंधी मार्गदर्शन कराल का ? सहजयोग्यांनी त्याविषयी कसे बोलावे?**

**श्रीमाताजी :-** सहजयोग्यांनी अगुरुंविषयी कसे बोलावे हे त्यांनी परस्पर ठरविले पाहिजे. तुम्ही बघता आहत जे अगुरुंकडे जातात, त्यांना किती त्रास सहन करावा लागतो. त वेडे देखील होतात. एक उदाहरण द्यायचे झाले तर, मी जेव्हा शिकागोला गेले होते, तिथे एक हरे राम हरे कृष्णा पंथाचा एक अनुयायी होता. तो शिकागो येथील अध्यक्ष होता. त्याने आपले डोक्याचे मुंडण केलेले होते. डोक्यावर फक्त शेंडी खेचराच्या शेपटासारखी होते. मी त्याला म्हटले महाशय मी एक आई आहे, या थंडीत आपण नुसते धोतरावर कसे राहू शकता?इतकी थंडी ? या थंडीत मी कुडकुडत आहे. तो सांगू लागला की माझ्या गुरुने सांगितले आहे की धोतर वापरल्याने तुम्हाला मोक्ष प्राप्त होईल.मी म्हटलं की माझ्या देशात तर ८०% लोक धोतर वापरतात, त्यांना मोक्ष मिळायला हवा? त्याने त्याच्या डोक्याचे मुंडण केले होते मी विचारले, तुम्ही मुंडण का केले? तो म्हणाला , माझ्या गुरुने सांगितले की हे स्थान आहे जिथून स्वर्गात

प्रवेश केला जातो. ती व्यक्ती अमेरिकन होती. मी त्याला म्हटले आहे की, जर डोक्याचे मुंडण केल्याने स्वर्गात स्थान मिळत असेल तर मेंढयांचे वर्षात दोनदा मुंडण केले जाते. मग तर मेंढ्या स्वर्गात असायला हव्यात. तुम्हाला कुठे स्थान मिळेल? यावर ती व्यक्ती माझ्यावर नाराज झाली. आपण तर माझ्या गुरुविरुद्ध बोलता आहात. मी म्हटले, माझ्यावर नाराज होऊ नका, तुम्हाला वाटेल ते करा, कारण ते तुमच्या गुरुने सांगितले आहे. परंतु या धोतर घातल्याने तुम्ही आजारी पडलात तर मात्र माझ्याकडे येऊ नका. भारतात रोज हरे रामा हरे कृष्णा म्हटले जाते. इंग्रजाप्रमाणे आम्ही रोज सुप्रभात नाही म्हणत, आम्ही हरे राम म्हणतो आणि आमच्या जीभेवर आलेली अभिव्यक्ती आहे. कशाप्रकारे आपण स्वर्गात जाऊ शकता? तो माझ्यावर नाराज झाला. नंतर त्याला नीला धमनीचा रोग झाला, त्याच्या पुढील वर्षी तो माझ्याकडे आला.

अशा लोकांशी वागताना तुम्हाला सावध रहावे लागते. ते त्यांच्या गुरुचे गुलाम असतात व विचारात कट्टरता भरलेली असते. माझ्यासमोर आल्याबरोबर काही लोक थरथर कापतात आणि जमिनीवर पडतात. परंतु आता अधिक तर लोक संपलेले आहेत. ते सर्वप्रथम संमोहित करतात. भारतात आमच्याकडे एक असा अगुरू होता. तो लोकांना संमोहित करून स्वीस घड्याळे इत्यादी काढून लोकांना देत असे. भारतात बरेच लोक त्याला बघण्यासाठी गेले, त्या ठिकाणी चार कॅमेरे लागले होते. कॅमेरांना तो सम्मोहित करू शकला नाही. कॅमेरात स्पष्ट दिसले, कसा त्याने गळ्यातील हार मागविला आणि पुढे दिला. भारतात तर आमचे श्रीमंत लोक किती मूर्ख आहेत, केवळ तेच नाही, तर गरीब लोक देखील त्यांच्याकडे हिरे घ्यायला जातात. काय आपण याची कल्पना करू शकता काय? ते सर्वप्रकारची चलाखी करतात. परंतु वर्तमानपत्रांनी त्यांना उघडे केले. परमात्म्याच्या कृपेने अशा सर्व लोकांचे ढोंग बाहेर पडते. सर्व असत्याचा पडदा उठला. सर्वप्रथम जर तुम्ही त्यांना सांगितले की तुम्ही गुरुंना पैसे देणार नाही तर हे तथाकथित अगुरू समुद्रात उड्या मारतील.

**प्रश्न:- चित्ताची एकाग्रता कशी करावी?**

**श्रीमाताजी :-** यासाठी तुम्हाला विशेष काही करावयाचे नाही, पण तर जे पण तुम्ही करणार आहात ते मानसिक माध्यमातून घडणार आहे. मानसिक गतिविधी रेखीव असते, त्यात कोणतेही सत्य नसते. ती एका सीमेपर्यंत जाऊन वळून तुम्हालाच त्रास देते. परंतु आत्म्याची शक्ती चोहोकडे पसरते. आता तुम्ही चित्तासंबंधी विचारले आहे. हे अत्यंत सहज आहे. कुंडलिनी जेव्हा वर चढते, तेव्हा चहुकडे पसरलेले चित्त अशा प्रकारे वर उडते की ते मध्यावर येते. कुंडलिनी जेव्हा सहस्रार भेदन करते तेव्हा चित्त पूर्ण तेजोमय होते. तुम्हाला काही करावे लागत नाही,फक्त कुंडलिनीला अशा प्रकारे वर चढवावे लागते. बस! कोणत्याही गोष्टीला जेव्हा तुम्ही बघता, तेव्हा विना विचार करता तिच्याकडे बघा. काय तुम्ही मला विचार न करता बघू शकता का? आता तुम्ही कार्य करणारी शक्ती हातावर जाणवू शकता. हाच नमाज आहे. पण मुसलमान यासंबंधी काही काही जाणत नाही. तुम्हाला थंड चैतन्यलहरी जाणवतील. ही कार्य करणारी शक्ती आहे. आपल्या बोटांवर तुम्हाला तुमच्या आणि इतर लोकांच्या चक्रांची स्थिती जाणवेल. ज्या लोकांना आपल्या हातावर वा टाळूवर थंड किंवा गरम व्हायब्रेशन्स जाणवले, त्यांनी आपले हात वर करा. वा! तर आपणा सर्वांना जाणवले तर इतके सहज आहे. कारण आपण त्यासाठी तयार झाला आणि शिवाय आपण रशियातील लोक आहोत.

**प्रश्न : अतिचेतनेमधू न येणाऱ्या रोग निवारक शक्त्या काय आहेत? बरेच लोक अतिचेतन शक्तीने रोगांवर इलाज करतात, ही रोगनिवारक शक्ती आणि कुंडलिनीची रोग निवारक शक्ती यात फरक काय?**

**श्रीमाताजी :** रोग निवारक शक्त्या दोन प्रकारच्या आहेत, एक ती जिला सामूहिक अवचेतनेची शक्ती प्राप्त होते आणि दुसरी जिला सामूहिक अतिचेतनेची शक्ती प्राप्त होते. दोन्हीचा इलाज होतो, परंतु ते त्या समस्यांवर अवलंबून आहे. उदा. सामूहिक अवचेतन शक्ती असणारी व्यक्ती डाव्या बाजूच्या समस्यांचा इलाज करू शकते आणि अतिचेतन शक्तीवाली व्यक्ती उजव्या बाजूवर.भारतात दोन प्रकारचे लोक आहेत. ज्यांना आम्ही मांत्रिक व तांत्रिक असे म्हणतो. मांत्रिक म्हणजे स्मशानात आणि कबरस्थानात जाऊन मृत आत्म्यांना पकडण्याचा प्रयत्न करणारे. हे मृत आत्मे फार धूर्त प्रकारचे असतात. हे धूर्त आत्मा तथाकथित समाजसेवी या वर्णप्रणालीनुसार

ते शुद्र असल्याने लोकांची सेवा करण्याच्या प्रयत्नात चांगले असल्याने लोकांची सेवा त्यांना आवडत असते. त्यांना मदत करू इच्छितात आणि म्हणून मरण्याची इच्छा नसते. ते पृथ्वीग्रहाच्या अवती-भवती फिरत रहातात. यांना वाईट व्यवहार त्यांना पसंत असतो. कामजीवन त्यांना आवडते. ते कामुक वा कामक्रूर, दुसऱ्यांना त्रास देणारे असतात. या प्रकारचे सर्व मृत लोक आपल्या चोहीकडे आहेत, हे डाव्या बाजूचे भूत आहेत. पण अत्यंत भित्रे आणि मिळून रहाणारे आहेत. हे मांत्रिक लोक अशा मृत लोकांना वश करून घेतात आणि त्यांना सांगतात, हे काम करा, ते काम करा, यावर ताबा मिळवा, तिकडे जा, इत्यादी. दासभाव असल्याने ही भूते या कामाअंती फारच प्रसन्न होतात. म्हणून कुणाला जर मानसिक रोग असेल, उदा. कुणाचा मृत्यू झाला असेल, तर मानसिक धक्का बसल्याने ती व्यक्ती आणि मांत्रिक मृत आत्म्यांना सांगतात, की, तुम्ही फार काळ या व्यक्तीला त्रास देत आहात आता तिला सोडा. मग एक मृत आत्मा त्या व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीमध्ये प्रवेश करण्यास हे उद्युक्त करतात. हे मांत्रिक संपर्क अधिकारी असतात. या आत्म्यांना वश करून एका व्यक्ती मधून-हटवून कुणा दुसऱ्या व्यक्तीत प्रवेश करावयाला लावतात. याप्रकारे पहिली व्यक्ती ठीक होते.

उदा. एक स्त्री होती, जिचा पती फारच जास्त दारू पित असे. ती स्त्री मांत्रिकाकडे गेली आणि तिच्या पतीला ठीक करण्यास सांगितले. त्यासाठी त्याने शंभर रुपयाची मागणी केली. त्यानंतर त्याने त्यात मृत आत्मा टाकला, ज्यामुळे दारुडे भूत गेले. या व्यक्तीने दारू तर सोडली, परंतु रेससाठी जाऊ लागला. तेव्हा त्या स्त्रीने परत रेसवाले भूत हटविले आणि आणखी एक भूत त्यात घुसविले. आता तिचा पती वाईट स्त्रियांकडे जाऊ लागला. आता ही महिला फार घाबरली. प्रत्येक वेळी पैसे द्यावे लागत होते आणि बरेच पैसे खर्च झाले होते. तिने मांत्रिकाकडे तक्रार केली. यानंतर तर आढळून आले की आता तिचा पती तीन दुष्कर्म करू लागला. ती स्त्री त्या मांत्रिकाकडे भांडायला गेली तर त्याने तिच्यातही भूत घुसविले. तेव्हापासून ती वेडी झाली आणि मीही तिला ठीक करू शकले नाही. ती फार सुंदर आहे. एका कारखानदार श्रीमंत माणसाशी तिचा विवाह झाला आणि आता अशाप्रकारे जीवन ती जगत आहे- अर्थात मेणबत्ती दोघांच्या शिरावर जळत आहे. अवचेतन लोकांमध्ये अशी परिस्थिती आहे.

दुसरा प्रकार अतिचेतन मधल्या लोकांचा आहे. उदा. डॉक्टरांचे आंतरराष्ट्रीय रोग निवारण केंद्र. ते आंतरराष्ट्रीय भूत होते, रोगी व्यक्ती त्यांना लिहून कळवित असे की, कोणत्या रोगाने ते पिडित आहेत. सर्व मृत अतिचेतन लोक, जे अत्यंत महत्वकांक्षी असतात, जसे मोठे डॉक्टर, वकील वैज्ञानिक, इंजिनिअर, आर्किटेक्ट, हिटलर सारखे काही उजव्या बाजूला एकत्र होतात.मृत्यूनंतर डॉक्टर तिथे आपल्या सर्व मित्रांना भेटला, त्यांच्याशी संपर्क झाला.कारण हा डॉक्टर मरण्याची इच्छा करीत नव्हता व नेहमी कुठल्या नी कुठल्या प्रयोगात मग्न होता. या डॉक्टरच्या आत्म्याने व्हिएन्नामध्ये एक सामान्य शिपायावर आक्रमण केले. तो लंडनचा डॉक्टर होता आणि त्याने जाऊन मुलाला अमूक क्लिनीक सुरू करण्यास सांगण्याची इच्छा प्रकट केली. डॉक्टरने आपल्या मुलात प्रवेश केला नाही. कारण त्याला माहीत होते की मुलाचे आरोग्य इतके चांगले नाही. त्याला एक अत्यंत शक्तीशाली आणि निरोगी पुरुषाची गरज होती, ज्यात तो प्रवेश करू शकेल. म्हणून त्याने या शिपायाला पकडले.

तो शिपाई त्याच्या मुलाकडे गेला आणि त्याने सांगितले, तुझे वडील माझ्यात आहेत आणि ते क्लिनीक सुरू करू इच्छितात. मुलाचा त्याच्यावर विश्वास बसला नाही. तेव्हा भाव समाधीत जाऊन त्या शिपायाने सांगितले की काही गुप्त धन ठेवलेले आहे आणि हळूच त्याविषयी मुलाला सांगितले. तेव्हा मुलाचा विश्वास बसला आणि वडिलांकरीता त्याने क्लिनिक सुरु केले. सारे पैसे त्याने क्लिनिक करीता दिले. जेव्हा तो इच्छा करीत असे सर्व भूत डॉक्टर्स त्याला मदत करीत असत. या पातळीवर आंतर संपर्क सुरू झाला होता, अर्थात सामूहिक अतिचेतनेतून.उच्च रक्तदाब, किडनी व गर्भाशयाच्या विकाराने त्रासलेली एक स्त्री त्यांच्याकडे गेली. त्यांनी तिला लंडन केंद्राला पत्र लिहून कळविण्यास सांगितले. तिकडून उत्तर आले अमूक दिवशी, अमूक वेळेला आम्ही तुमच्यात प्रकट होऊ आणि इलाज करू. परंतु तुम्ही तुमच्या बिछान्यावर झोपून रहा. बरोबर त्यादिवशी ती थरथर कापायला लागली. त्या मृत डॉक्टरने तिच्यात प्रवेश केला होता. ती रोगमुक्त झाली. एक वर्षापर्यंत ती ठीक राहिली. नंतर तिला चक्कर यायला लागली. जेव्हा ती माझ्याकडे आली. पूर्ण तऱ्हेने ती संपलेली होती. तिला माहीत होते की एका आत्म्याने तिच्यात प्रवेश केला आहे. ती माझ्याकडे आली आणि

सांगू लागली तिच्यात आता दहा- बारा आत्मे आहेत आणि ती त्यांना सहन करू शकत नाही.

तेव्हा अतिचेतनेमुळे असेही रोग निवारण होते. समजा एखादा वास्तूकार अशा लोकांकडे जाईल. तर ते मृत वास्तूकाराच्या आत्म्यांना आत बोलवू शकतात. हत्यारी जॅकच्या आत अशाच एका मृत हत्यारीचा आत्मा होता. व्यक्तीमध्ये ह्यासाठी इच्छा असली पाहिजे. अशा लोकांमध्ये दुर्बलता असल्याने मृत आत्मे पटकन त्यांची पकड घेतात. शारीरिक दृष्टया काही समस्या असेल तर अतिचेतन उपयोगी होऊ शकते. जर मानसिक समस्या आहेत तर अवचेतन लोक साह्य करू शकतात. पण ही मदत अस्थायी असल्याने परत वेगाने पूर्व स्थितीला येतात.

**प्रश्न :परमपूज्य श्रीमाताजींच्या प्रवचनानंतर एका साधकाने मासांहाराबद्दल विचारले. त्या प्रश्नोत्तराचा सारांश**

**श्रीमाताजी :** मांस... ठीक आहे, आता मी मांसाहाराविषयी सांगेन,फारच आवश्यक आहे.बघा, मानवाच्या हृदयात करुणा अवश्य असली पाहिजे. कोंबड्यांना विचारण्याचा काय फायदा? मी त्यांना आत्मसाक्षात्कार देऊ शकते का? साधी गोष्ट आहे. बघा, करुणेतही तुम्ही चिकन खाऊ शकता...खाऊ शकता.... कारण चिकन जेव्हा तुम्ही खाता ते विकास प्रक्रियेत जाते, आपली विकासप्रक्रिया सुधारते. परंतु तुम्ही असा पशु नाही खाल्ला पाहिजे जो आकाराने तुमच्यापेक्षा मोठा असेल. नाहीतर तुम्हाला त्रास होईल. त्याचे मास तुम्हाला आक्रमक बनविल. आक्रमक पशू वा आकाराने मोठे प्राणी खाणारी व्यक्ती पशूसारखी बनते, आक्रमक होते.कारण हे मोठे आकाराचे पशू तुमच्यापेक्षा मोठे आहेत, म्हणून ते पशू आहेत. ...म्हणून व्यक्तीला आपल्यापेक्षा आकाराने मोठ्या प्राण्याचे मांस नाही खाल्ले पाहिजे. या प्राण्यात करुणेची जाणीव देखील असते. त्यांच्यात तुमच्याप्रती स्नेहभाव असतो. उदा. डॉल्फीन घ्या. डॉल्फीनला नाविक मारीत नाहीत ना त्यांचे मास खात, कारण ते मानवाच्या पातळीवर बरेचसे जवळ आहेत. ते बरेचसे आपल्या सारखे आहेत. त्यांच्यात भावना आहेत भावनेची जाणीव आहे. ते तुमचे मनोरंजन करतात, इत्यादी हे उच्च प्राणी आहेत. आणि जरी आपण किडे -मकोडे यांचाही विचार करू लागलो, तर कुठपर्यंत जाऊ शकतो?

...म्हणून आपली करुणा सर्वप्रथम मानवासाठी हवी. काय आपण आपल्या सहसोबतीसाठी करुणामय आहोत? आम्ही नाही. सर्वप्रथम मानवासाठी करुणामय होण्यासाठी प्रयत्न करा. ठीक आहे? सर्वप्रथम मानवासाठी करुणामय होण्यासाठी प्रयत्न करा आणि तुम्हाला आश्चर्य वाटेल, याचा कधी अंत होणार नाही. आम्ही मानवाच्या सीमा पार करू शकत नाही. नंतर त्या प्राण्याच्या प्रती करुणामय होण्याचा प्रयत्न करू जे आपल्या सोबत आहेत. ठीक आहे. कुत्रे, घोडे, गाय आणि अन्य सर्व पाळीव प्राणी, डॉल्फिन मासे, जे विकसित झाले आहेत. ते प्रथमपासून विकसित होत आहेत. परंतु जर तुम्ही चिकन खाल्ले, किंवा मी चिकन खाल्ले तर मला पूर्ण विश्वास आहे की हे काही चांगले बनेल, त्याचा काही विकास होईल, यात शंकाच नाही.मानवाच्या प्रती करुणा-आपण तर आपल्या मुलांकरीता करुणामय नसतो. मी चकीत झाले हे ऐकून या देशात इंग्लंडमध्ये आई वडील प्रत्येक दिवशी दोन मुलांची हत्या करतात.....

आम्ही ते प्राणी खाऊ इच्छितो, ज्याच्या काही जाती नष्ट होत चालल्या आहेत. जसे शक्य असेल तसे आपण सर्व प्राण्यांचे रक्षण केले पाहिजे. त्यांची हत्या करून त्यांचा वंश खंडीत करणे योग्य नाही.हे तर या गोष्टींचा अतिरेक होण्यासारखे आहे.जे आम्ही करीत आहोत, ठीक आहे?याउलट, मी म्हणेन, जे लोक जास्त मासांहार करतात, त्यांनी अधिक मांसाहार करू नये. मांसाहार थोडा कमीच केला पाहिजे. असे केल्याने ते कमी आक्रमक होतील, यात शंका नाही. परंतु भारतात आम्ही जास्त शाकाहार करतो. हे देखील आवश्यक नाही. थोडेसे मांस खाल्ले पाहिजे. तुम्ही मांस खाऊ शकता व चिकन मास, हे ठीक आहे. परंतु गायी, म्हशी, बैल, घोडे, हत्ती, वाघ आणि सापांचे मास खाऊ नका. हे मांस तुमच्यासाठी चांगले नाही. लोक साप खातात, फणीवाले साप खातात, न जाणो , काय काय खातात? पाली देखील खातात. सांगण्याचा उद्देश असा आहे की, या सर्व गोष्टी खाऊ नयेत. बेडका सारखे प्राणी देखील नाही खाल्ले पाहिजे. बेडूक एक विशेष जीव आहे. त्यावरील प्रेमामुळे मी म्हणते,या प्राण्याला खाऊ नये. मला माहीत नाही परंतु प्राचीन बंद खडकामध्ये बेडूक आहेत, असे लोकांना आढळले आहे. याठिकाणी पाणी पोहचले जाते. बेडूक परमात्म्याला

आवडतो, तो विशेष जीव आहे. कोट्यावधी वर्षांपासून बेडूक जिवंत आहे. कल्पना करा हे कसे होऊ शकते? यात काही तरी विशेष असेल. त्याच्या प्रेमामुळे आम्ही त्याचे मांस खाऊ नये.उदा. माकडांना कुठे खाल्ले जाते-ऑस्ट्रेलियात, इंडोनेशियात? इथे असे व्हायला नको. माकडही अद्‌भूत जीव आहे. आम्ही असे प्राणी नाही खाल्ले पाहिजेत. ज्यांच्या प्रजाती नष्ट व्हायला नको. जोपर्यंत शक्य आहे. त्यांचा वध करून त्यांना समाप्त करू नका – प.पू.श्रीमाताजी कॅक्सटन हॉल इंग्लंड, मार्च,१९८२

आत्मसाक्षात्काराने तुमच्यात दिव्य विवेक विकसित होतो आणि दिव्य सद्‌सद्‌विवेक देखील

**प्रश्न : जे जाणू इच्छितात की कामशक्तीचा कुंडलिनी जागृतीशी काय संबंध आहे?**

**श्रीमाताजी :–** काही नाही. त्याचे काही काम नाही. ही चुकीची समजूत आहे. तुम्ही चार्ट लावला आहे का? आता तिथे बघा,खालील बाजूस जिथे लाल चक्र दिसते, हे मलविसर्जन व कामशक्तीचे चक्र आहे. (जे आपल्या सर्व यौन विषयक घडामोडी व मलविसर्जनांच्या कार्याला बघते)कुंडलिनी याच्या वर आहे.दुसरे असे, श्री येशू ख्रिस्तांनी म्हटले होते, तुमची दृष्टी अपवित्र नाही झाली पाहिजे, कारण कुंडलिनी याठिकाणी इसामसीहाच्या द्वारावर, आज्ञाचक्रात थांबते. कारण तुमची दृष्टी अस्थिर असेल तर आज्ञा चक्र अवरुद्ध होते. सहजयोगात आपण चांगल्या विवाह जीवनावर विश्वास करतो, वाईट कामप्रवृत्तीकडे नाही. परंतु आम्हाला काही सांगावे लागत नाही कारण तुम्ही तुमचे स्वामी बनता, गुरू बनता व आत्मा तुमचा गुरू आहे आणि एक वेळेला जेव्हा तुम्ही प्रत्येक गोष्टीकडे आत्म्याच्या प्रकाशातून बघू लागता, सर्व विकृतीचा त्याग करता. उदा. जर तुम्ही अंधारात एक साप पकडला आहे आणि आपण तो बघू शकत नाही. मी जर त्याला सोडण्यास सांगू तर तुम्ही म्हणाल – मी दोरी पकडली आहे, मी तिला का सोडू? परंतु जर प्रकाश पडला तर तुम्ही तो साप लगेच सोडाल. म्हणून आत्मसाक्षात्काराने तुमच्यात दिव्य विवेक आणि सद्‌सद्‌विवेक विकसित होतो.

– प.पू.श्रीमाताजी, दक्षिण अमेरिका, बोगोता, कोलंबिया, २०.९.१९८८

## गुढी पाडवा -दिल्ली, २४.मार्च ९३

आज सत्ययुगाचा पहिला दिवस आहे. सहजयोग सत्ययुगाला घेऊन आला आहे. तुम्ही आत्मसाक्षात्कारी लोक आहात. तुम्हाला स्वत:वर श्रद्धा- विश्वास असायला हवा. सहजयोगाच्या कार्यशैलीवर आपली श्रद्धा असायला हवी. पूर्ण विश्वास असायला हवा. माझ्याकडे पहा. मी एकटीने इतका सहजयोग पसरवला आहे! फक्त परमचैतन्यावर विश्वास ठेवा. जर तुमच्या मनामध्ये काही प्रश्न असतील, तर तुम्ही मला विचारू शकता. त्याचे समाधान करायला मी तुमच्यासमोर आहे.एकूणच काय की सहजयोग्यांना शंकाविरहीत व्हायला हवे.

१) सहजयोग्यांना खूपच सावधान रहायला पाहिजे. त्यांनी अहंकार विरहीत व्हायला हवे. ते संदेश पाठवायचे केवळ माध्यम आहेत.

२) कोणत्याही गोष्टीची योजना बनवायच्या वेळी आपले चित्त सर्वात अधिक महत्त्वपूर्ण गोष्टींवर असायला हवे.

३) जर कुठे काही नकारात्मकता असेल, तर मला सांगा. मी त्यास ठीक करीन.

४) आयोजन करताना धनाची चिंता करू लागतात. ती व्यवस्था आपोआप होते. परंतु जर आपण चिंता करीत बसाल, तर अवघड होईल.तसंही धन हे इतके सर्वात महत्त्वपूर्ण असे नाही.

५) एकमेकांबद्दल आपल्यामध्ये विवेक असायला हवा.

६) आपल्याला कशाचेच भय असता कामा नये. हे तर सर्व केवळ एक नाटक चालू असते. चिंता करण्याचे काहीच कारण नाही. जर तुमच्या हातून काही चूक झाली तर मी त्याबद्दल तुम्हाला सांगत असते. पण त्याबद्दल वाईट वाटून घेता कामा नये. मी सुधारून टाकते. तुम्ही माझ्याबद्दल भीती बाळगायचे काहीच कारण नाही.

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ।।
करुनी घेयावे हे तुमते । विनुवितु असे ।।

# श्रीमाताजी छिंदवाडा जन्मस्थान भेट, १८ मार्च २००८













# पुणे महानगरपालिका मानपत्र प्रदान समारंभ, ७ एप्रिल २००८










